# मेहता मराठी ग्रंथजगत

मे, २०२५
पृष्ठे ६८ किंमत : रु.१५
वर्ष पंचविसावे
अंक पाचवा



## साहित्य पुरस्कारासाठी आवाहन



# 'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार'



'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे संचालक श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सन २०२४ पासून **'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार'** देण्यास सुरुवात झाली. या पुरस्काराची घोषणा १० जानेवारी, २०२३ रोजी डॉ. किरण बेदी यांच्या उपस्थितीत करण्यात आली होती.

या पुरस्काराचे स्वरूप खालीलप्रमाणे असून साहित्य क्षेत्रात प्रथम प्रकाशनास प्रोत्साहनपर हा पुरस्कार दिला जाणार आहे.

**सर्वोत्कृष्ट कादंबरी**
**₹ ३०,०००/-**

**सर्वोत्कृष्ट कथासंग्रह**
**₹ २०,०००/-**

### पुरस्कारासाठी अर्ज करण्यासंदर्भात प्राथमिक नियम व अटी :

१ ऑक्टोबर, २०२४ ते ३० सप्टेंबर, २०२५ दरम्यान प्रकाशित झालेली लेखकाची पहिली कादंबरी किंवा कथासंग्रह या पुरस्कारासाठी ग्राह्य धरली जाईल.

अर्ज स्वीकृतीची अंतिम तारीख : १ नोव्हेंबर, २०२५ पर्यंत

पात्र इच्छुकांनी पुस्तकाची एक प्रत, संपूर्ण परिचय, संपूर्ण माहिती (नाव, पत्ता, संपर्क क्रमांक) आणि फोटो आमच्या पत्त्यावर पाठवावे.

या पुरस्काराची घोषणा डिसेंबर, २०२५ मध्ये केली जाईल. १२ जानेवारी, २०२६ रोजी श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिदिनी पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे.

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ मे २०२५ ◆ वर्ष पंचविसावे ◆ अंक पाचवा

**संपादक**
अखिल मेहता

**संस्थापक संपादक**
शंकर सारडा

**संपादन साहाय्य**
प्रतीक येतावडेकर

**अंकाची किंमत १५ रु.**
वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाइन पाठवावी.

**प्रसिद्धी :**
दरमहा ११ तारखेस

**मांडणी-अक्षरजुळणी**
*मेहता पब्लिशिंग हाऊस*


— *अनुक्रमणिका* —


**संपादकीय** **४**
**पुरस्कार** **८**
**विशेष लेख** **११**
**पुस्तकाच्या पानांतून**
पुस्तक वाचणारं फुलपाखरू १४
घरटे २२
छत्र्यांचं झाड २८
मोरपंखी सावल्या ३६
परोपकारी बिरबल आणि इतर कथा ४८
सफर प्राणिसंग्रहालयाची ५४
छोट्यांसाठी हवा, पाणी, प्रकाशाचे प्रयोग ५८
**दिनविशेष** **६२**



संपादक-मुद्रक-प्रकाशक : अखिल मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, पुणे ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२ । E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक अखिल सुनील मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून, १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - अखिल सुनील मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Akhil Sunil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Akhil Sunil Mehta.

# संपादकीय

## सुट्टीची पर्वणी अन् बालसाहित्याची मेजवानी

दर उन्हाळी सुट्टीत आम्ही बालवाचकांसाठी ‘बालविशेषांक’ प्रसिद्ध करत असतो. त्याचप्रमाणे मे २०२५चा अंक मेहता मराठी ग्रंथजगत ‘बालविशेषांक’ म्हणून आपल्या हाती देताना आम्हाला आनंद होत आहे. दरवर्षीप्रमाणेच यात मुलांसाठी खास अशी मेजवानी आहे. या अंकात आमच्या ग्रंथसूचीतील निवडक बालसाहित्याचा समावेश केला आहे. तो वाचून बालवाचकांना नक्कीच सुट्टीचा आनंद घेता येईल.

मराठी साहित्यात बालसाहित्य हे विशेष प्रकारचे साहित्य म्हणून गणले जाते. बालसाहित्याची निर्मिती करणे म्हणजेच मनोरंजनपर, प्रबोधनपर आणि बालवाचकांच्या पसंतीस उतरेल असे लिखाण करणे हे आव्हानात्मक असते. बालसाहित्याची पुस्तके सर्व वयोगटाच्या लोकांना भुरळ घालत असतात. सचित्र बहुरंगी पुस्तके, नेमका आशय अशा प्रकारची बालसाहित्याची पुस्तके बाजारात उपलब्ध आहेत. उत्कृष्ट पेपरवरील बहुरंगी छपाई यामुळे पुस्तके बालचमूला भुरळ घालत असतात.

पंचतंत्र, अकबर-बिरबल, तेनालीराम, जातककथा ही भारतीय साहित्यातील बालसाहित्याची खास अशी पुस्तके होत. आजही या पुस्तकांना मागणी पाहायला मिळते. अलीकडच्या काळात महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने ‘गोष्टींच्या गुहेत’ नावाने एक बालसाहित्यातील कथांचे संकलन प्रसिद्ध केले आहे. सुप्रसिद्ध लेखिका व बालसाहित्यिक मंगला वरखेडे यांनी या पुस्तकांचे संपादन केले आहे. या प्रकारचे पुस्तक प्रसिद्ध करून राज्य साहित्य संस्कृती मंडळाने खूप महत्त्वाचे काम केले आहे.

बालसाहित्यात प्रसिद्ध झालेली बरीचशी पुस्तके आपल्या प्रदेशाशी संबंधित असतात. आपण राहतो त्या भागातील लोककथा, कहाण्या या साहित्य म्हणून मुलांच्या कानी पडतात. ही पहिली पायरी म्हणता येईल. त्यानंतर जिज्ञासू बालवाचकांकडून त्या साहित्याबद्दल कुतूहलपूर्वक विचारणा होऊन त्यांच्यामधला सजग वाचक घडण्याची प्रक्रिया खऱ्या अर्थाने सुरू होते. या वाचनरूपी बीजाचे रोपण बालवयातच होणे आवश्यक आहे. या प्रकारे सजग बालवाचक तयार होऊ शकतो. शालेय स्तरावर वाचनाची आवड मुलांमध्ये निर्माण व्हावी याकरिता 'पुस्तकवाचन तास', 'पुस्तक पेटी' या प्रकारचे उपक्रम राबवलेले पाहायला मिळतात. या प्रकारच्या उपक्रमांमुळे वाचनचळवळीला हातभार लागलेला पाहायला मिळतो, शालेय जीवनात झालेले वाचनरूपी संस्कार हे विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावतात. प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन या सर्वच शैक्षणिक टप्प्यांवर 'वाचनरूपी संस्कार' होणे आवश्यक आहे.

बालसाहित्य हे मुलांच्या मनोरंजन व प्रबोधन यासाठी लिहिले गेलेले पाहायला मिळते. मेहता पब्लिशिंग हाऊसच्या ग्रंथसूचीत बालसाहित्याची विशेष यादी आहे. त्या पुस्तकांना कायमच चांगली मागणी असते. बहुरंगी, सचित्र पुस्तके पाहिल्यावर कुणालाही ती पुस्तके घेण्याचा मोह होतच असतो. बालसाहित्यात अनुवादित पुस्तकेही आहेत. चरित्रपर, मनोरंजनपर, विज्ञानविषयक या विषयांवरील पुस्तके आमच्या पुस्तकदालनात तसेच वेबसाईट, ॲमेझॉन इत्यादी साइट्सवर देखील उपलब्ध आहेत.

दरवर्षी उन्हाळी सुट्ट्यांमध्ये आम्ही बालसाहित्याची नवीन पुस्तके मुलांसाठी आणत असतो. या मे महिन्यात देखील बालसाहित्याची पुस्तके आम्ही प्रकाशित करणार आहोत. त्यात तीन पुस्तके अकबर-बिरबल मालिकेतील आहेत. 'हकूनामटाटा' ही मंजुश्री गोखले यांनी लिहिलेली बालकादंबरी इत्यादी पुस्तके प्रकाशित होत आहेत याचा आम्हाला मनस्वी आनंद होत आहे.

आमच्या सर्व बालवाचकांना उन्हाळी सुट्टीनिमित्त 'गोष्टींची सुट्टी' हा उपक्रम आम्ही राबवत आहोत. 'गोष्टींची सुट्टी' या अंतर्गत आमच्या पुस्तक दालनात २६एप्रिल, ३मे, १०मे व १७मे या प्रत्येक शनिवारी एक बालसाहित्यिक बालवाचकांना गोष्ट सांगण्यासाठी, संवाद साधण्यासाठी येणार आहे. यामध्ये राजीव तांबे, वृषाली पटवर्धन, लीना सोहोनी व मंजूषा आमडेकर हे बालवाचकांशी संवाद साधतील. या निमित्ताने लेखकांना भेटण्याची संधी बालवाचकांना उपलब्ध होणार आहे. चला तर भेटूयात! या उन्हाळी सुट्टीत, दर शनिवारी सायंकाळी ५ वाजता.

आमच्या सर्व बालवाचकांना उन्हाळी सुट्टीच्या शुभेच्छा!

अखिल
मेहता

# मेहता मराठी ग्रंथजगत

**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.**

आमच्या छापील अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ४५० रुपये**

**पंचवार्षिक वर्गणी ६०० रुपये**

डिजिटल अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ३०० रुपये**

**पंचवार्षिक वर्गणी ४०० रुपये**

***Available on***

amazonkindle | Google Play Books

**Find us on: facebook®**

https://www.facebook.com/mehtapublishinghouse

# मेहता पब्लिशिंग हाऊस

BOOK CLUB

या क्लबचे सभासद व्हा. आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके निम्म्या किमतीत मिळवा!

## टी बुक क्लब

आजच व्हा सदस्य, निम्म्या किंमतीत मिळवा पुस्तकं

* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक


**टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!**

₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. पोस्टेज खर्च अतिरिक्त.

फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५

सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक -

www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx




नाहीत स्कॅन केलेली पाने
किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच,
खरीखुरी **eBooks**
युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर –
थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड,
किंडल आणि अॅन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

ebook available on :

amazonkindle | Get it on Apple Books | Google Play Books

# पुरस्कार

## सुनंदा अमरापूरकर यांना 'सावाना'चा वाङ्मयीन पुरस्कार

नाशिक : सार्वजनिक वाचनालय, नाशिक यांच्यातर्फे देण्यात येणाऱ्या २०२४च्या वाङ्मयीन पुरस्कारांचं नुकतंच वितरण करण्यात आलं. या कार्यक्रमात सुनंदा अमरापूरकर यांना 'खुलभर दुधाची कहाणी' या त्यांच्या आत्मकथनासाठी सुप्रसिद्ध निवेदक सुधीर गाडगीळ यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. सार्वजनिक वाचनालयाच्या मु. शं. औरंगाबादकर सभागृहात हा पुरस्कार सोहळा पार पडला. सुनंदा अमरापूरकर यांचं मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे मन:पूर्वक अभिनंदन!



लक्षवेधी

## 'वाचक पसंती'चा मानाचा तुरा..!

'महाराष्ट्र टाइम्स' आणि 'पॉप्युलर प्रकाशन' यांच्या संयुक्त विद्यमाने, वाचकांचा साहित्यविषयक कल आणि मान्यवरांचा कौल अशा आशयानुरूप 'लोकप्रिय मराठी पुस्तक' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाला साडेतीन हजार वाचकांच्या पसंतीची दाद मिळाली. मेहता मराठी ग्रंथजगतच्या वाचकांना सांगण्यास आनंद होतो की, या स्पर्धेतून 'वाचकांच्या पसंतीची तीन सर्वोत्तम पुस्तके' म्हणून सन्मान मिळालेल्या पुस्तकांमध्ये रणजित देसाई यांची 'स्वामी' आणि शिवाजी सावंत यांची 'मृत्युंजय' या मेहता पब्लिशिंग हाऊसच्या दोन अजरामर कादंबऱ्या; तर तिसरी भालचंद्र नेमाडे यांची 'कोसला' हिचासुद्धा सामावेश आहे. याबरोबरच 'मान्यवरांनी निवडलेली तीन सर्वोत्कृष्ट पुस्तके' या विभागात दया पवार यांचं 'बलुतं,' जी.ए.कुलकर्णी यांचं 'काजळमाया' आणि गौरी देशपांडे यांचं 'दुस्तर हा घाट' यांचा सामावेश आहे. तसेच विवेक कडू यांचे 'चार चपटे मासे' हे पुस्तक 'परीक्षक विशेष पुरस्कार' यासाठी निवडलेले आहे.

रणजित देसाई लिखित 'स्वामी' ही कादंबरी १९६२साली प्रकाशित झाली; परंतु मेहता पब्लिशिंग हाऊसमध्ये १९८१पासून पुनर्प्रकाशित होत आहे. ऐतिहासिक, पौराणिक, सामाजिक या विषयांबरोबरच देसाईंनी चरितकहाणी हा कादंबरीचा नवीन प्रकार असा काही हाताळला की, थोरले माधवराव पेशवे आणि त्यांच्या पत्नी रमाबाई यांच्यातील कोमल भावबंधाला 'स्वामी' या कादंबरीतून वाचकांसमोर आणलं. ऐतिहासिक चरितकहाणी हे समीकरण असं काही गुंफलं गेलं की, तो भावनिक दरवळ अजूनही वाचकांना हवा-हवासा वाटतो. हाच खरंतर या कादंबरीचा वर्षानुवर्षं होत आलेला सन्मान आहे. महाराष्ट्र शासन आणि साहित्य अकादमीतर्फेही या कादंबरीला गौरवण्यात आले आहे. १९६२साली प्रकाशित झालेल्या या कादंबरीची ४०वी आवृत्ती प्रकाशनाच्या वाटेवर आहे.


शिवाजी सावंत यांना भारतीय जीवन आणि संस्कृती याबद्दल असलेल्या सार्थ अभिमानाने 'माझा भारत म्हणजे महाभारत' या समीकरणाच्या अध्ययनाच्या ध्येयाने आणि मूळत: असलेल्या अभ्यासूवृत्तीने त्यांनी महाभारताचा सखोल

अभ्यास सुरू केला; परिणामत:, त्यातून जन्माला आली, प्रदीर्घ व रससंपन्न अशी- सूर्यपुत्र कर्णाच्या आयुष्याचे न उलगडलेले पदर उलगडून धैर्यशाली व तेजस्वी कर्ण जगाला दाखवणारी कादंबरी 'मृत्युंजय..!' केसरी-मराठा संस्थेकडून न. चिं. केळकर सन्मान; कोल्हापूरचा ललित सन्मान; बंगाली वाचकांच्या विवेक संस्थानकडून पूनमचंद भुतोडिया सन्मान; भारतीय ज्ञानपीठ संस्थेकडून मूर्तिदेवी सन्मान; राज्य शासन आणि केंद्र शासनाचा साहित्य अकादमी सन्मान अशा प्रतिष्ठित सन्मानांनी या कादंबरीला पुरस्कृत केले आहे. १९६७साली प्रकाशित झालेल्या या कादंबरीची ३७वी आवृत्ती प्रकाशनाच्या वाटेवर आहे.

'स्वामी' व 'मृत्युंजय' या मेहता पब्लिशिंग हाऊसच्या मानबिंदूंबरोबरच 'श्यामची आई' आणि 'राजा शिवछत्रपति' याही वाचकांच्या आवडत्या पुस्तकांची साधारणत: पाच लाखांहून अधिक प्रतींची विक्री झालेली आहे आणि उत्तरोत्तर ती वाढत जात आहे याचा आनंदच आहे. मराठी वाचकांवर तसेच, मराठी प्रकाशन व्यवसायावर ४९वर्षे नानाविध विषयांच्या साहित्याची बरसात करणाऱ्या 'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या अभिमानात, वाचकांकडून 'वाचक पसंती'चा मानाचा तुरा रोवण्यात आला याबद्दल कृतकृत्य वाटते. ◆













## विशेष लेख

# अण्णांच्या सहवासातील प्रसन्न क्षण

शनिवार १९ एप्रिल, २०२५ सकाळचे दहा वाजलेले. कराडमधल्या कोयना वसाहतीमधल्या श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांच्या बंगल्याच्या दारात मी, सदानंद कदम, सौ. नंदा कदम असे तिघे जण पोहोचलो. श्रीनिवास विनायक कुलकर्णी ऊर्फ अण्णा यांच्या भेटीचा योग आला होता. जुन्या आठवणींनी मनात फेर धरला होता. कोविडपूर्व काळात 'डोह' वाचलेलं, त्यामधल्या लेखांनी माझ्या मनात घर केलेलं, मनातून खूपदा औदुंबरचा डोह, तिथला निसर्ग, आजूबाजूचं वातावरण याची सैर झालेली होती. मध्यंतरीच्या काळात 'डोह' पुस्तकाच्या प्रती दुकानांमध्ये सहजासहजी उपलब्ध होत नव्हत्या. कोल्हापुरातील राजारामपुरीतल्या 'ग्रंथ'मधून उपलब्ध असलेल्या सर्वच्या सर्व प्रती मीच खरेदी केल्या होत्या. या सर्व आठवणींनी मनात फेर धरला होता. जानेवारी २०२४ मध्ये सदानंद कदम सरांनी माझ्यासाठी 'डोह'च्या प्रतीवर अण्णांची स्वाक्षरी घेऊन ठेवली होती. त्यानंतरच्या कराड दौऱ्यात अण्णांच्या चारही पुस्तकांवर कदम सरांनी माझ्यासाठी स्वाक्षरी घेऊन ठेवलेल्या, त्याच वेळेस एवढ्या सह्या कुणासाठी, अशी विचारणा अण्णांनी केली. 'या सह्या प्रतीकसाठी घेतल्यात. तो पुण्याच्या मेहता

पब्लिशिंग हाऊसमध्ये काम करतो.' अशी माहिती अण्णांनी सरांना दिली होती. 'पुढच्या वेळेस त्याला घेऊन ये' असा आदेशच अण्णांनी सरांमार्फत माझ्यापर्यंत पोहोचवला होता.

मधल्या काळात कामाच्या व्यापामुळे वा योग नसल्यामुळे अण्णांची भेट काही जुळून येत नव्हती. अखेर तो योग १९ एप्रिल, २०२५रोजी आला. सदानंद कदम सरांची 'काळीजखुणा' व 'गाथा स्वराज्याची' ही दोन पुस्तके द्यायला सरांसोबत अण्णांच्या घरी दाखल झालो. त्यानंतरचे दोन तास फक्त साहित्यचर्चा आणि गप्पाटप्पा. या भेटीत अण्णांना 'मेहता मराठी ग्रंथजगत' या आमच्या गृहपत्रिकेचे दोन अंक भेट देण्यासाठी नेले होते. ते अंक स्वीकारत असतानाच, 'अंकावर सही करून मग अंक भेट द्या.' असा प्रेमळ आदेश अण्णांनी दिला. मीही मग, आदरणीय अण्णांना, 'स्नेहपूर्वक!' असा मजकूर लिहून त्याखाली माझी झोकात सही करून, अंकाच्या प्रती अण्णांच्या हाती सुपूर्द केल्या. अंक हातात पडल्या-पडल्या अण्णांमधील संपादक जागा झाला संपादकीय नजरेने त्यांनी अंक न्याहाळला आणि त्यांनी समाधानही व्यक्त केले, जणू शाबासकीच!

सदानंद कदम सरांनी दिलेली 'काळीजखुणा' व 'गाथा स्वराज्याची' ही दोन पुस्तके पाहत असतानाही आम्ही अण्णांकडे पाहत होतो. अण्णांमधील संपादक आजही चिरतरुण आहे याचा अनुभव या वेळेस आला. चष्मा लावल्यामुळे त्रास होत असल्याने त्यांनी भिंग घेऊन पुस्तकाची आतील माहिती पहिल्यांदा पाहिली. पुस्तकछपाई, पुस्तकाची निर्मिती यावर नेमक्या टिप्पण्या 'संपादकीय' नजरेने येत होत्या. त्याच संपादकीय नजरेतून अण्णांनी माझ्याकडे नजर टाकत विचारले, ''काय, लिखाण करता का? कविता लिहिल्या आहेत का?'' त्यावर मीही, ''अहो अण्णा, संपादकाने लेखकांना लिहितं ठेवायचं काम केलं पाहिजे.'' असं उत्तर दिलं; तर ते ऐकून संपादकीय अनुभवातून, ''अहो, एक संपादक म्हणून तुम्ही लिखाण केलंच पाहिजे; कारण ते तुमच्या स्वत:साठी महत्त्वाचं असतं.'' असा प्रेमळ सल्ला मिळालाच; परंतु ही नकळत केलेली सूचनाही होती याचीही जाणीव झाली. मुखपृष्ठ, मांडणी, पुस्तकाची उत्कृष्ट निर्मिती यावर नेमकं आणि मोजकंच

बोलून अण्णांमधला संपादक ९२व्या वर्षीही कसा चिरतरुण आहे याची साक्ष देत होता.

हे सर्व होत असताना आम्ही अण्णांच्या हालचाली न्याहाळत होतो आणि मनोमन सुखावत होतो. सलग २२वर्षे मौज प्रकाशनासाठी संपादक म्हणून केलेले काम आणि आलेले नानाविध अनुभव यातून त्यांचे जीवन खऱ्या अर्थाने घडले होते, याचा याचि देही याचि डोळा अनुभव आम्हीही घेत होतो. आपल्या प्रकाशनसंस्थेची गृहपत्रिका संपादन करत असताना मला येणाऱ्या अनुभवांवर उद्याचा मी कसा असेन (कदाचित अण्णांसारखाच का?) असा विचार क्षणभर का होईना मनात डोकावून गेला आणि वातावरणातील चैतन्याची जाणीव झाली.


या सर्व गोष्टींच्या अनुभवात रमताना एक खूणगाठ मनाशी बांधली, ती म्हणजेच अण्णांसारख्या ज्येष्ठ आणि करारी संपादकांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवत, माझ्यासारख्या तरुण पिढीतील प्रतिनिधींनी आपलं काम चोख बजावलं पाहिजे. हा विचार डोक्यात सुरू असतानाच, अण्णांच्या समोर नतमस्तक झालो, त्यांचा आशीर्वाद घेतला आणि अण्णांचा निरोप घेऊन परतीच्या प्रवासासाठी मार्गस्थ झालो.

**– प्रतीक येतावडेकर**





## पुस्तकाच्या पानांतून




# पुस्तक वाचणारं फुलपाखरू

**राजीव तांबे**

पाठीवर सॅक घेऊन अन्वय शाळेत निघाला.

अन्वय म्हणाला, ''आईऽऽआई, तूपण चल ना माझ्याबरोबर. तू बरोबर असलीस की गप्पा मारत जाताना, शाळा लवकर आल्यासारखी वाटते. तू नसलीस की एकट्याने जायला जाऽऽम कंटाळा येतो. आई, प्लीऽऽऽज, चल ना माझ्याबरोबर.''

अन्वयची समजूत काढत आई म्हणाली,''अरे अन्वू, आता मला खूप कामं आहेत. मी तुला आणायला संध्याकाळी शाळेत नक्की येईन.''

तरीपण चिरपिर चिरपिर हट्ट करत अन्वय म्हणाला, ''ऑऽऽऽई, एकट्याने शाळेत जायला मला कंटाळा येतो.''

अन्वयला जवळ घेत आई म्हणाली, ''अरे अन्वू, बाळा थांब, मी एक जादू करते, म्हणजे आज शाळेत जाताना तुला नक्की कुणीतरी भेटेल.''

''खर्रऽऽच आई..?''

''हो तऽऽर!''

आईने सांगितल्यावर अन्वयने डोळे मिटले. अन्वयच्या उजव्या हातावर आईने डावा हात ठेवला आणि त्यावर खाली वाकून फूंक मारली.

आई म्हणाली, ''अन्वय, डोळे उघड. मी मनातल्या मनात मंत्र म्हणून फूंक मारली आहे. जा. आता तुला जाताना मित्र भेटेल.''



अन्वय खूश झाला. आईला टाटा करून निघाला.

अन्वय रस्त्यावर आला. त्याने इकडे-तिकडे पाहिलं; पण त्याला कुणी भेटलंच नाही.

अन्वय रस्ता क्रॉस करून थोडा चालला.

मग त्याने मागे-पुढे पाहिलं; पण त्याला कुणी भेटलंच नाही.

अन्वय धावतधावत गेला; पण तरीही त्याला कुणी भेटलंच नाही.

आता अन्वय नाराज झाला. त्याला कंटाळा आला.

आईने इतकी जादू करूनसुद्धा आपल्याला कसं कुणी भेटत नाही याचं त्याला आश्चर्य वाटलं.

तो नेहमी शाळेत जाताना बागेच्या बाहेरून जायचा; पण आज त्याने बागेतून जायचं ठरवलं.

अन्वय बागेत शिरला आणि एक फुलपाखरू भिरभिरत त्याच्याकडे आलं.





फुलपाखरू मिश्या हलवत म्हणालं, ''अरे अन्वय, काल संध्याकाळी बागेत आमची 'मध पार्टी' होती. आम्ही सर्व मित्रांनी वेगवेगळ्या फुलांमधला मध एकत्र करून प्यायला. एकदम अमेझिंग, यम्मी टेस्ट! खूप मजा आली. वेगवेगळे वास आणि निरनिराळ्या चवी यांचं अफलातून मिश्रण. मी प्रथमच असे भन्नाट चवींचे आणि धुंद सुगंधी मध प्यायलो. लई भारी, मित्रा...''

''म्हणजे एकूण फुलं तरी किती होती?? आणि तुम्ही मित्र?''

''अरे एकूण ३९ फुलं होती; पण प्रत्येक फुलाचा वास वेगळा आणि मधाची चव तर त्याहून वेगळी!''

''आणि मित्र..?''

'अरे, सगळी बाग माझ्या मित्रांनी इतकी भरून गेली होती की बागेत फुलं फुलली आहेत की फुलपाखरं हेच कळत नव्हतं!''

''व्वा! कमालच आहे!''

''कमाल कसली? माझी पंचाईतच झाली.''

''म्हणजे काय, झालं काय?''

“मित्रांसोबत गुणगुणताना, बागेमध्ये फिरफिरताना, फुलांवर भिरभिरताना, मधाचे थेंब गिळगिळताना मी नकळत इतका मध प्यायलो, इतका मध प्यायलो की...”

“काय झालं?”

“मी एका फुलावर गाढ झोपी गेलो. त्यामुळे सकाळी उशिरा उठलो. आता आईची बोलणी खावी लागतील म्हणून लपतछपत पळालो. तितक्यात तू भेटलास.”

“म.. आता चल ना शाळेत.”

फुलपाखरू गयावया करत म्हणालं, “अन्वय, अजून माझं सगळं आवरून व्हायचं आहे रे! मी पट्कन आवरतो आणि चट्कन येतो.”

“नक्की?”

“हो, नक्की!”

उजवा हात पुढे करत अन्वय म्हणाला, “दे प्रॉमिस!”

अन्वयच्या उजव्या हातावर बसत फुलपाखराने त्याला प्रॉमिस दिलं. अन्वय खूश झाला.

मग रमतगमत अन्वय गेला शाळेत.

सूर्रकन भुरभुरत फुलपाखरू गेलं बागेत.

फुलपाखराने घरी जाता जाता बागेत गिरगिर भिरभिर फिरून सगळ्यांना सांगितलं की, आज मी शाळेत जाणार आणि तुम्ही इथेच राहणार. मी शाळेत बाकावर बसणार, खुर्चीवर बसणार; पण तुम्ही फक्त बागेतच बसणार. मी शाळेत जाऊन खेळणार, तुम्ही मातीत लोळणार. मी शाळेत अभ्यास करणार, तुम्ही इथे फक्त एकमेकांची तोंडं बघणाऽऽर ...

बागेतली फुलं म्हणाली, ''बरं बरं पाहूया. काहीतरी करूया. तू शाळेत जाताना आम्हाला सांगून जा. आमच्यातला गोड-गोड सुगंधी मध पिऊन जा.''

फुलपाखरू ''हो... हो'' म्हणत भिरभिरलं. सूर्रकन घरी गेलं.

फुलपाखरांच्या बोलण्याने बागेतल्या फुलांना राग आला होता.

फुलांनी ठरवलं आपणपण काहीतरी आयडिया करून शाळेत जाऊया.

आपण पण वर्गात जाऊया. बाकावर बसूया. शाळेत खेळूया. अभ्यास करूया.

काही फुलं म्हणाली, ''बस्स... जायचं म्हणजे जायचंच. शाळेमध्ये जायचंच!''

बाकीची फुलं म्हणाली, ''येस्स! जायचं म्हणजे जायचंच. शाळेमध्ये जायचंच!''

आता तर सगळी बाग म्हणू लागली, ''येस्स येस्स येस्स! जायचं म्हणजे जायचंच. शाळेमध्ये जायचंच!''

मग सगळ्या बागेने फुलांच्या मदतीने एक सॉलिड प्लॅन तयार केला. शाळेत जायचा सट्टमखट्टम प्लॅन.

आता बागेतली फुलं फुलपाखराची वाट पाहू लागली.

एकमेकांकडे पाहत डोलू लागली. पाकळीतल्या पाकळीत हसू लागली.

पटापट आवरून आणि आईला सांगून सूर्रफूर्र करत फुलपाखरू आलं.

बागेतली फुले त्याची वाटच पाहत होती.

फुलांनी फुलपाखराला बोलावलं.

फुलपाखरू मध पीत असताना फुलाने पाकळ्या बंद केल्या आणि फुलपाखराला घट्ट पकडून ठेवलं.

आता फुलपाखरू घाबरलं. त्याला कळेना आता काय करावं?

इथून कसं सुटावं आणि शाळेत जावं?

अन्वय वाट पाहत असेल, आता त्याला कसं भेटावं?

फूल हसतच म्हणालं, ''तुला एका अटीवर मी सोडेन...''

''बोल, कोणती अट?''

''आम्हीपण येणार तुझ्याबरोबर. आम्हालापण शाळा बघायची आहे आणि ...''

''आणि काऽऽय?''

''आणि आम्हालाही वर्गात जायचं आहे. बाकावर बसायचं आहे. शाळेत जायचं

आहे. आम्हालापण वर्गात बसून अभ्यास करायचा आहे.''

फुलपाखराने भीतभीत विचारलं, ''आम्ही म्हणजे कोणकोण?''

आणि सगळी बाग एकदम ओरडली, ''अख्खी बाग... अख्खी बाग. सगळी-सगळी बाग!''

हे ऐकून फुलपाखरू सटपटलं. ते चिटूरपिटूर करत म्हणालं, ''मी तुम्हाला मघाशी उगीचच चिडवलं;

पऽऽण...''

सगळी बाग किंचाळली, ''पण काऽऽऽय?''

''तुम्हाला वर्गात जाता येणार नाही.''

''का?''

''तुम्हाला बाकावर बसता येणार नाही.''

''का...का?''

''तुम्हाला शाळेतच जाता येणार नाहीऽऽ''

सगळ्या बागेने आणि फुलांनी चिडून विचारलं, ''का? काऽऽ? आणि काऽऽऽ?''

''अरे, माझ्या बागफुल मित्रांनो, तुमच्यापेक्षा शाळा लहान आहे. शाळेपेक्षा वर्ग लहान आहे. वर्गापेक्षा बाक लहान आहे. मग मला सांगाऽऽऽ''

''काऽऽऽय?''

''तुम्ही शाळेत जाणार कसे? आणि वर्गात जाऊन बाकावर बसणार कसे?''

बाग विचार करू लागली. झाडे सळसळत सळसळू लागली.

फुले विचार करत डोलू लागली. एकमेकांशी गुजूबुजी गुजूबुजी करू लागली.

बागफुले विचार करून म्हणाली, ''ठीक आहे! हरकत नाही. आम्ही शाळेच्या बाहेर थांबू. मधल्या सुट्टीत लहान मुले आमच्या सोबत खेळतील.

पऽऽऽण...''

''अंऽऽआता पण काय?''

''शाळेत कसं जायचं, हे आम्हाला कुणालाच माहीत नाही. म्हणून आम्ही सर्व तुझ्याबरोबरच येणार.''

फुलपाखराने ''हो...होऽऽ''

म्हणताच त्याची फुलातून सुटका झाली. बागफुले म्हणाली,

''आम्ही पटापट आवरून

घेतो. मग आपण निघू.''

◆

## पुस्तकाच्या पानांतून




# घरटे

वि. स. खांडेकर

## पराभव

एका पराक्रमी राजाने शत्रूचे राज्य जिंकले. त्या राज्याच्या राजधानीत प्रवेश करण्याकरिता मोठ्या थाटाने आणि विजयी मुद्रेने तो आला. नगरद्वारापाशी त्याला एक पुतळा दिसला. तो पाहताच राजा चकित



झाला. अशी अप्रतिम कला त्याने पूर्वी कुठेच पाहिली नव्हती. राजा पुतळ्याकडे पाहात उभा राहिला. मिरवणूक तिथल्या तिथे थांबली.

तो पुतळा हे पराक्रमाचे मूर्तिमंत प्रतीक होते. आकाशाकडे त्याची ती तीव्र, एकाग्र दृष्टी- स्वर्गातून अमृत आणणाऱ्या गरुडाची नजर होती ती! पायांना विळखा घालणाऱ्या नागांचा तो पुतळा दोन्ही हातांनी चोळामोळा करीत होता. गरुडाला शोभेल अशीच ती कृती होती!

ती कलाकृती पाहून मुग्ध झालेल्या राजाने विचारले, 'कुणी केला आहे हा पुतळा ?'

सभोवतालच्या गर्दीतून कुणी तरी पुढे येईल आणि त्या पुतळ्याचा निर्माता म्हणून आपल्याला अभिवादन करील अशी त्याची कल्पना होती. पण कुणीच पुढे आले नाही.

राजाने रुष्ट स्वराने विचारले, 'हा पुतळा कुणाचा आहे?'

भीत भीत भोवतालच्या गर्दीतून कुणी तरी म्हणाले, 'महाप्रतापी महाराजांनी ज्याचा पराजय केला त्या पळपुट्या राजाचा.

राजा विजयी मुद्रेने पुन्हा त्या पुतळ्याकडे पाहू लागला. आता त्याला तो मघाइतका कलापूर्ण वाटेना!

त्याने प्रश्न कला, 'हा पुतळा करणारा शिल्पकार नगरातच आहे?'

गर्दीतून कुणी तरी म्हणाले, 'हो.'

'मग तो आमच्या स्वागताकरिता इथं कसा आला नाही? जा. त्याला आत्ताच्या आत्ता घेऊन या. तो आल्याशिवाय माझा नगरप्रवेश होणार नाही.'

तत्काळ सैनिकांनी त्या शिल्पकाराला बंदिवान करून आणले.

राजा त्याच्याकडे निरखून पाहात म्हणाला, 'हा पुतळा तुम्ही केला?'

'हो!'

'कसा?'

'कसा? ते मी काय सांगू? वेलींवर कळी कशी येते आणि तिचं फूल कसं होतं हे महाराज सांगू शकतील काय?'

राजा कुंठित झाला. तो मनातून चिडला होता. पण ती चीड बाहेर न दाखविता तो म्हणाला, 'हा पुतळा कुणाचा आहे?'

शिल्पकाराने शांतपणे उत्तर दिले, 'माजी महाराजांचा.'

राजा उपहासपूर्ण हास्य करीत म्हणाला, 'तो आता महाराज नाही!

साधा राजासुद्धा नाही! रानावनाचा आश्रय करून जगणारा एक पळपुटा मनुष्य आहे तो.’

‘असेल!’

‘अशा पळपुट्या माणसाचा पुतळा करून तो पराक्रमी आहे असं भासविणं म्हणजे जगाला फसविणं आहे.’

‘आज आपण विजयी वीर म्हणून नगरात प्रवेश करीत आहात. पूर्वी या महाराजांनी असाच नगरप्रवेश केला होता! त्या विजयाची स्मृती म्हणून मी हा पुतळा केला. आज मी आपला पुतळा केला आणि उद्या नगरप्रवेश करणाऱ्या राजानं त्याचा अधिक्षेप आरंभला तर-?’

राजाने कठोर दृष्टीने शिल्पकाराकडे पाहिले, मग तो तीव्र स्वराने म्हणाला, ‘तुमचा हात दगडांतून स्वर्ग निर्माण करीत असेल! पण तुमची जीभ ती तुम्हाला सप्तपाताळात गाडून टाकील हे विसरू नका.’

‘कलावंताची जीभ आणि हात निराळे नसतात, महाराज. त्यांचा मेंदू आणि काळीजही भिन्न नसतात. राजाधिराज, राजनीती वारांगनेप्रमाणे आपली रूपं बदलत असेल! पण कलाकाराची नीती ही पतिव्रता आहे. जीवनात फक्त एकच अंतिम सत्य आहे हे ती जाणते. ते सत्य म्हणजे आपल्या आत्म्याच्या प्रकाशात फुलत जाणं.’

एखादा ज्वालामुखी हळूहळू धुमसू लागावा, तसा शिल्पकाराच्या प्रत्येक शब्दाने राजा अधिक अधिक क्रुद्ध होत होता. आता एकदम त्या ज्वालामुखीचा स्फोट झाला! तो कर्कश स्वराने म्हणाला, ‘तुम्ही कुणी सामान्य मनुष्य असता, तर या उन्मत्तपणाबद्दल मी तुम्हाला शिरच्छेदाची शिक्षा दिली असती! पण-’

राजाची मुद्रा एकदम प्रफुल्लित झाली. कलावंताला द्यायच्या शिक्षेचे

एक अभिनव तंत्र त्याला स्फुरले होते! तो शांतपणाने म्हणाला, 'तुम्हाला अगदी अल्प शिक्षा देतो मी. या सर्व लोकांसमक्ष तुम्ही हा पुतळा आत्ताच्या आत्ता फोडून टाकला पाहिजे!'

लोकांत गडबड उडाली, जिकडे तिकडे कुजबूज सुरू झाली.

पण नगरद्वारापाशी तीन पुतळे शांतपणे उभे होते- राजा, शिल्पकार आणि शिल्पकाराने घडविलेला तो पुतळा!

पळ युगासारखे भासत होते. अशी कित्येक युगे गेली. शंभर, दीडशे, दोनशे-

राजाने प्रश्न केला, 'शिल्पकार, माझी आज्ञा मान्य आहे?'

'नाही.'

'शिरच्छेदाला तयार व्हा.'

शिल्पकार हसत उत्तरला, 'काळीज गमावण्यापेक्षा डोकं गमावणं फार बरं!'

राजा संतप्त झाला. शिल्पकाराला कैचीत पकडण्याकरिता त्याने प्रश्न केला, 'तुम्ही आतापर्यंत स्वत:चा एकही पुतळा नाहीसा केलेला नाही?'

'एकच का? माझ्या कैक पुतळ्यांचा या हातांनी मी नाश केला आहे.

'तो का?'

'त्यात माझी कला प्रगट झाली नव्हती म्हणून. त्या पुतळ्यांत माझ्या आत्म्याचं प्रतिबिंब पडलं नव्हतं म्हणून. या पुतळ्याची गोष्ट निराळी आहे. ही माझी आवडती कलाकृती आहे. पोटच्या गोळ्यापेक्षाही हिच्यावर माझं प्रेम आहे. माझं काम जगात सौंदर्य निर्माण करण्याचं

आहे. सौंदर्याचा विध्वंस करण्याचं नाही. त्या कामाकरिता परमेश्वरानं राजेमहाराजे निर्माण केले आहेत!'


शिल्पकाराचे हे शब्द ऐकताच भोवताली पसरलेल्या जनसमुद्राच्या अंतरंगात एक प्रचंड हिमलाट पसरली. विजयी राजाचा असा अपमान करणारा मनुष्य आता क्षणभरही जिवंत राहणे शक्य नाही हे उघड दिसत होते.

पण राजाने मान खाली घातली होती. किती तरी वेळ तो तसाच उभा होता.

शेवटी मान वर करून तो म्हणाला, 'शिल्पकार, तुमच्या या राजाचा मी पराभव केला. पण त्याच्या या पुतळ्यानं आज माझा पराभव केला आहे! युद्धातला विजय हा अंतिम विजय होऊ शकत नाही हे आज मला कळलं!'

◆

## पुस्तकाच्या पानांतून




# छत्र्यांचं झाड

मूळ लेखक
**बाय बिंग**

चित्रकार
**ली होंगझुआन**

पांडा बहीण-भावांच्याकडे एक खूप जुनी लाल-लाल कागदाची छत्री होती. पाऊस पडायला लागला, की ते दोघे त्या छत्रीत थांबायचे. पाऊस-वाऱ्यापासून ती छत्री बहीण-भावांचं रक्षण करायची. ऊन पडलं की हीच छत्री त्यांना सावली पण द्यायची. पांडा भावंडांना ती छत्री खूप-खूप आवडायची. इतकी की

त्यांनी ती छत्री छान सजवली होती. त्याच्या दांड्याला पांडाची छोटी बाहुली अडकवली होती.

आणि त्या छत्रीलासुद्धा हे दोघे पांडा बहीण-भाऊ आवडायचेच. ते दोघे तिच्याखाली उभे राहून गप्पा मारत हसायला लागले, की तिला फार आनंद व्हायचा.



एक दिवस आपला पांडा भाऊ छत्री घेऊन चालला होता. सोसाट्याचा वारा आला. छत्री उडून झाडावर अडकून बसली. छत्री, छत्रीचा दांडा सगळं मोडून गेलं. पांडा बहीण-भावांना खूप-खूप वाईट वाटलं.

पांडा बहीण-भाऊ घरी आले. भावाने आईला विचारलं, ''आई, ही छत्री तू दुरुस्त करू शकशील का?''

आई म्हणाली, ''बाळा, मी फक्त तसा प्रयत्न करू शकते.''

पुन्हा पाऊस सुरू झाला, तेव्हा पांडा भावंडं त्यांची छत्री शोधू लागले; पण स्टॅन्डमध्ये त्यांना फक्त नवीन छत्री मिळाली. या नवीन छत्रीवर खूप चित्रं होती.

आई म्हणाली, ''ती तुमची लाल छत्री दुरुस्त होऊ शकत नव्हती; ती टाकून द्यावी लागली.''

''पण मला लाल छत्री हवीय,'' बहीण म्हणाली.

''मला पण आमची लाल छत्रीच हवीय,'' भाऊ म्हणाला.

आई म्हणाली, ''अरे, पण मी ती कचऱ्यात टाकून दिली; पण तुम्ही पट्कन गेलात तर कदाचित तुम्हाला ती मिळेलही.''


''मला माझ्या लाल छत्रीची आठवण येतीय,'' असं म्हणून बहीण रडायला लागली. भाऊसुद्धा रडायला लागला.

त्या दिवसापासून पांडा भावंडं ती लाल छत्री सगळीकडे शोधू लागले. ती लाल छत्री कुठे बरं गेली असेल?

अस्वलमामांनी ती छत्री कचऱ्याच्या ट्रकमध्ये टाकली होती. तो ट्रक आता पार टोकाला गेला होता.

एका माकडाला ती लाल छत्री सापडली. तो ती तलवारीसारखी नाचवत होता. थोड्या वेळाने त्याला कंटाळा आला आणि त्याने ती छत्री जमिनीवर फेकून दिली.

मग एका हरणाला ती लाल छत्री सापडली. त्या छत्रीवर घोडा-घोडा खेळून हरणानंही ती छत्री फेकून दिली.



मग कोल्ह्याला ती लाल छत्री मिळाली. झेंडा फडकावल्यासारखी ती छत्री फडकवत तो थोडा वेळ फिरला आणि शेवटी जमिनीत ती छत्री रोवून टाकली.

असाच काही काळ निघून गेला. वाऱ्या-पावसात छत्री तशीच उभी राहिली. तिचा लाल कागद खराब होऊन गेला. आता फक्त छत्रीचा दांडा आणि वरच्या काड्या उरल्या.

त्या छत्रीला पुन्हा पहिल्यासारखं लाल छत्री व्हावं, असं वाटत होतं. तिला वाटायचं आपण पांडा बहीण-भावंडांना पुन्हा पहिल्यासारखं ऊन-पावसापासून वाचवत आहोत; पण आता ती फक्त एक लाकडाची दांडी होती. टाकून दिलेली आणि बिनउपयोगाची.



लाल छत्री दु:खी होती. तिच्या डोळ्यांत पाणी तसंच राहिलं आणि ती झोपी गेली. तिला स्वप्न पडलं की, पांडा बहीण-भाऊ तिच्या-खाली उभे राहून गप्पा मारत आहेत.

पण ती छत्री जागी झाली तेव्हा तिला जमिनीत मुळं उगवली होती आणि तिच्या डोक्यातून कोवळी हिरवी पानंही फुटत होती.

दिवसेंदिवस तिच्या पानांना चांगलाच बहर आला, फांद्या विस्तारल्या आणि खोड चांगले जाड आणि मजबूत वाढले...

एक दिवस तिच्या फांद्यांवर फुलं आली. प्रत्येक फूल म्हणजे इवलुशी लाल-लाल छत्रीच होती. त्या एकेक करून खाली पडायला लागल्या.

गाढवाच्या पिल्लानं त्यातली एक छत्री उचलली.

गाईच्या पाडसाला एक छत्री मिळाली. भरपूर छोट्या छोट्या लाल छत्र्या निळ्या-निळ्या आकाशात आणि हिरव्या-हिरव्या जंगलात वाऱ्यावर उडत होत्या.

पांडा भावंडं त्यांची हरवलेली लाल छत्री सारखी सगळीकडे शोधत होते; पण त्यांना ती मिळत नव्हती. एके दिवशी डोंगराच्या पायथ्याशी त्यांना लाल छत्री घेतलेला गाढव दिसला. त्यांनी विचारलं, ''तू ही छत्री कुठून विकत घेतलीस? ही अगदी आमच्या लाल छत्रीसारखी दिसते आहे.''



गाढव म्हणालं, ''डोंगरावर एक छत्र्यांचं झाड आहे. त्या झाडाला छत्र्या लगडतात. ही छत्री तिथं झाडाखाली पडली होती. ती मी उचलली.''

पांडा भावंडं लगेच तिकडे धावत गेली. त्यांनीही एक छत्री उचलली. ''ही छोटीशी लाल छत्री छान दिसतीय; पण आपल्याला ती आपली जुनी लाल छत्री मिळायला हवी.''

''ते मला विसरले नाहीत. ते अजूनही मला शोधत आहेत.'' लाल छत्री ओरडली. पांडा भावंडांचं लक्ष जावं म्हणून ती जागच्या जागी हलायला लागली.


अचानक बहीण ओरडली, ''दादा, ते बघ...''

एका फांदीला त्यांची पांडा बाहुली लटकत होती.

भाऊ म्हणाला, ''ही तीच आहे. आपल्या छत्रीचं झाड झालं आणि त्याला या छत्र्या लागल्या.''

बहिणीनं झाडाला मिठी मारली, म्हणाली, ''तूच आमची लाल छत्री आहेस ना?'

भावानं पण झाडाला मिठी मारली, ''शेवटी एकदाची तू आम्हाला सापडलीस.''



त्या लाल छत्रीला हे खरंच वाटेना; पण पांडा भावंडांच्या चेहऱ्याची ऊब तिला जाणवली, तेव्हा तिचा विश्वास बसला. ती थरथरली आणि

आणखी छत्र्या खाली पडल्या.


पांडा भावंडं त्या झाडाखाली बसली तेव्हा छत्र्यांचं झाड आनंदाने हसत होतं. आपल्या सगळ्या छत्र्या आणि फांद्यांनी आईसारखं त्या भावंडांना उन्हापासून वाचवलं होतं.

पांडा भावंडं झाडाखाली झोपून गेली. त्यांच्या आजूबाजूला छोट्या लाल छत्र्यांचा सडा पडला होता. त्या छत्र्या म्हणजे त्यांच्या मैत्रिणीच्या झाडाचीच फुलं होती ना!

◆



## पुस्तकाच्या पानांतून




# मोरपंखी सावल्या

**रणजित देसाई**

## कीड

थंडीचे दिवस संपत आले होते. झाडीत उकाडा हळूहळू जाणवत होता. रानातलं खुरटं गवत पिवळं पडत होतं. शिरलेल्या वाऱ्यानं पिकली पानं उडू लागली होती. रानजाईचं दूरवर पसरलेलं जंगल मात्र हिरवंगार दिसत होतं. त्या जंगलाच्या, टेकड्यांच्या

२५

उतारावर पसरलेली हिरवळ अजूनही तग धरून राहिली होती. वरून उन्हाचा मारा होत असला, तरी गार वाऱ्याची झुळूक थांबली नव्हती. त्या वेळी अचानक एक गव्यांचा कळप जंगलाबाहेर पडला. खूर उधळत तो गव्यांचा कळप उताराच्या हिरवळीकडे धावत होता. त्यांची शिंगे उन्हात तळपत होती.

कळपाच्या पुढे एक धिप्पाड गवा खूर उधळत धावत होता. उंचपुरा, धिप्पाड आणि थोराड कपाळाचा! त्याची रुंद, बाकदार टोकाची शिंगं उन्हात तळपत होती. पक्कं पोलाद लवावं, तसे त्याचे भरदार स्नायू पळताना लवत होते. सारं अंग भुऱ्या केसांनी माखलं होतं. पळता पळता तो कळपाकडे मागे वळून पाहत होता. आवाज टाकून त्यांना जरब देत होता.

जंगलाच्या हिरवळीवर कळप पोहोचताच तो गवा थांबला. सारा कळपही थांबला. मान उंचावून त्या गव्यानं आपली नजर सर्वत्र फिरवली. हिरवळीच्या कडेला चरणारं एक भेकर त्यांना पाहताच त्वरेनं जंगलात घुसलं. माद्यांनी एकवार त्या गव्याकडे नजर टाकली आणि त्या हिरवळीवर चरू लागल्या. कळपातला दुसरा छोटा गवा माद्यांच्या आडानं गवत हुंगू लागला.

चरतानादेखील त्या छोट्या गव्याची नजर सारखी त्या मोठ्या गव्याकडं जात होती. जेव्हापासून छोट्या गव्याचं अंग भरू लागलं होतं, शिंगं बळ धरत होती, तेव्हापासून मोठा गवा त्याच्यावर अधिक लक्ष ठेवत होता. छोट्यावर नजर जरी पडली, तरी तो मोठा धुस्कारा टाकत होता. त्या धुस्काऱ्याच्या भीतीनं छोट्याचं मन अस्वस्थ होत होतं. त्या मोठ्याची नजर टाळायचा होईल तितका प्रयत्न तो करीत होता.

चरता चरता मोठ्यानं एकदा जोरानं मान हलवली. खूर बडवले. साऱ्या माद्या आणि छोटा गवा त्याच्याकडं चमकून पाहू लागली. माद्यांना अलीकडे त्याच्या वागणुकीचा अर्थच समजत नव्हता. कुठे तो फार वेळ ठरेनासाच झाला होता. क्षुल्लक कारणावरूनदेखील तो भडकत होता. त्याच्यामागं धावून माद्या थकल्या होत्या, कंटाळल्या होत्या.

मोठ्या गव्याला त्यांच्या डोळ्यांतली नाराजी समजत होती, कळत होती; पण त्यानं तो जास्तच अस्वस्थ होत होता. अलीकडे त्याला सारंच चमत्कारिक वाटत होतं. शिंगांत अखंड रिवरिव होत होती. गेळांतून आग पडल्यासारखी वाटत होती. शिंगांतल्या रिवरिवीनं त्याला जीव नकोसा झाला होता. त्या मोठ्या गव्यानं पुन्हा सर्वत्र नजर फिरवली. माद्या जरी गवत चरत होत्या, तरी त्याचं लक्ष त्यांच्यावर होतं, ह्याची जाणीव त्यांना होत होती. मोठ्या गव्यानं नाक उंचावून वास घेतला, आजूबाजूला न्याहाळलं आणि माद्यांची नजर चुकवून त्यानं गवताला तोंड लावलं. माद्याही समाधानाने चरू लागल्या.

उन्हाच्या तावानं मोठ्याचं अंग तापत होतं. त्यानं मोठ्या गव्याला बरं वाटत होतं. चरणाऱ्या कळपाकडं समाधानाने पाहत तो सारखा आजूबाजूला टेहळणी करत होता. त्याच हिरवळीच्या एका कडेला एक मोठं वारूळ होतं. वारुळावर लक्ष जाताच, त्या दिशेनं तो एकदम धावत सुटला. नकळत त्याच्या मागोमाग थोडं पळून कळप थबकला आणि आजूबाजूला टवकारून पाहू लागला.

वारुळाजवळ पोहोचताच गव्यानं आपलं मस्तक वाकवलं आणि त्या वारुळाला तो रेटू लागला, फुसकारू लागला आणि शिंगं

वारुळात खूपसून तो ते वारूळ उडवू लागला. वारुळाची माती त्याच्या शिंगांबरोबर उधळली जात होती. त्याचं भव्य कपाळ त्या तांबूस मातीनं रंगले होतं. सारा कळप कौतुकानं त्याच्याकडं पाहत होता. वारुळाला टक्कर देण्यात थोरल्या गव्याला सुख वाटत होतं. त्यानं एकदा वळून पाहिलं. साऱ्या माद्या त्याच्याकडं कौतुकानं पाहत होत्या. नव्या हुरुपानं तो गवा पुन्हा वारुळाला टक्कर देऊ लागला. शिंगानं माती उधळू लागला. बेभान होऊन तो त्या वारुळावर तुटून पडला. वारुळाचं शिखर पार कोलमडून गेलं. त्यातून वाळव्या सैरावैरा धावत बाहेर पडल्या. शिंगांच्या झटक्याबरोबर त्यातली उडालेली वाळवी त्याच्या मस्तकावर पडत होती. अचानक तो थांबला. त्यानं शिंगं झटकली, पण ते थांबले नाहीत. कानाच्या पाठीमागे शिरलेली वाळवी जोरानं चावे घेत होती. शिंगातली रिवरिव वाढली होती. त्यानं तो बेचैन झाला आणि चौखूर उधळला.

उतरणीवरून तो वाकडातिकडा धावत सुटला. माद्यांना थोडा वेळ काही समजलंच नाही.



त्या लांब जाणाऱ्या मोठ्याकडे त्या पाहतच राहिल्या. थोड्याच वेळात भानावर येऊन तो कळप त्याच्या

पाठीमागून धावू लागला.

अलीकडे ते त्यांच्या सरावाचंच झालं होतं.

सारी उतरण उतरून मोठा गवा त्या उतरणीच्या पाणथळ जागेला येऊन पोहोचला. फुसकारत त्यानं चिखलात आपलं मस्तक टेकलं, घुसवलं. त्याचं सारं मस्तक त्या चिखलाने बरबटलं. त्या थंड स्पर्शानं त्याला बरं वाटलं. कानात शिरलेलं पाणी झटकत तो उभा राहिला. कळप आला होता. त्यानं कळपावरून नजर फिरवली. छोटा गवा कुठे दिसत नव्हता. त्याने दचकून पाहिलं. बाजूला एका मादीच्या जवळ तो घुटमळत उभा होता. संतापानं मान हुंदाडून मोठा गवा त्या छोट्यावर धावून गेला. मोठ्या गव्याचं चिखलानं माखलेलं ते अजस्र धूड अंगावर येत आहे हे पाहताच, छोटा गवा चार पावलं मागे सरकला आणि पाठ फिरवून धावू लागला. त्या पळालेल्या गव्याकडं पाहत मोठा गवा समाधानानं मान ताठ करून उभा राहिला.

संतापानं, शरमेनं फुसकारत, शिंगं हलवत छोटा गवा कळपापासून थोड्या अंतरावर उभा होता. माद्यांकडे तो पाहत होता; पण माद्या मान वर करूनही त्याच्याकडे पाहत नव्हत्या. त्या खाली मान घालून चरत होत्या. छोटा गवा मुंगीच्या पावलानं कळपाजवळ सरकत होता. तो कळपात परत येऊन मिसळला, तरी माद्यांचं त्याच्याकडे लक्ष नव्हतं. त्या छोट्या गव्याची मान शरमेनं लवली होती. त्याच्या डोळ्यांत मोठ्या गव्याबद्दल अंगार पेटला होता.

त्यानंतरचे आठदहा दिवस असेच त्या थोरल्या गव्याच्या मागून धावण्यात गेले. दिवसेंदिवस तो गवा चिडखोर बनत चालला होता. त्याच्या शिंगातली रिवरिव आता गुणगुण बनली होती. त्याच्या

गेळांची आग वाढत होती. खाण्यावर त्याची वासना नव्हती. दिसेल त्या झाडाला शिंगं आदळत, मस्तक घासत तो पुढे जात होता.

कळप त्याच्यामागून धावत होता.

दिवसादिवसाला मोठ्या गव्याची शक्ती क्षीण होत होती आणि छोट्या गव्याला तर तो डोळ्यांसमोर उभा करून घेत नव्हता. सकाळी चारी पायांवर उभं राहायला मोठ्या गव्याला फार श्रम पडत. एका पहाटेला तो असाच जागा झाला. पहाटेचा धूसर प्रकाश सर्वत्र पसरला होता. त्यानं माद्यांकडे दृष्टिक्षेप टाकला. साऱ्या उभ्या राहून रवंथ करीत होत्या. तोही धडपडत उठला. हळूहळू प्रकाश जंगलावर फाकत होता. पक्ष्यांची किलबिल वाढत होती. कळपापासून थोड्या अंतरावर काहीतरी धसपसलं. चमकून थोरल्या गव्यानं तिकडे नजर टाकली. छोटा गवा एका मादीपाशी वास घेत उभा होता. त्याला मोठ्या गव्याच्या अस्तित्वाची जाणीवही नव्हती. ते पाहताच मोठ्या गव्याचं सारं भान हरपलं आणि तो जोराने धावला.

त्याच्या खुरांच्या आवाजानं छोट्या गव्यानं सावध होऊन पाहिलं. दुरून मोठा गवा वेगानं त्याच्यावर चालून येत होता. छोट्या गव्याला ते असह्य झालं होतं. चार पावलं मागे सरून, शिंगं खाली करून तो पवित्रा घेऊन उभा राहिला. छोट्या गव्याबद्दल वाटणाऱ्या किवेने साऱ्या माद्या धडधडत्या अंत:करणानं बघत राहिल्या.

खाडकन मोठ्या गव्याची शिंगं छोट्याच्या शिंगांवर आदळली; पण जे व्हायला हवं होते ते झालं नाही. छोटा गवा त्या धडकीनं तसूभरही माघारी वळला नाही. मोठ्या गव्याचं सारं मस्तक त्या

धडकीने बधिर झालं. वेदना थांबल्या. शिंगं सोडवून घेऊन मोठा गवा चार पावलं मागे सरला आणि मान कलती करून उभा राहिला. मोठ्या गव्यानं पुन्हा ताकदीनं जोराची धडक दिली. मोठ्या गव्याच्या शिंगांतून छोट्या गव्याची शिंगं निसटली आणि मोठ्या गव्याच्या मानेत घुसली. मोठ्या गव्याचे पुढचे पाय मटकन वाकले. भानावर येऊन, तोल सावरत तो मागे सरकला. छोट्याची शिंगं बाहेर पडताच त्याच्या मानेतून रक्ताच्या चिळकांड्या उडाल्या. त्या वेदनेनं तो बेफाम झाला. विस्फारित डोळ्यांनी त्यानं छोट्याला निरखलं आणि मान वळवून तो छोट्यावर तुटून पडला.

दोघंही एकमेकांवर प्राणपणानं तुटून पडले होते. शिंगांचे 'खाडखाड' आवाज घुमत होते. रागानं घुसवलेल्या खुरांबरोबर गवतांच्या चकांद्या मुळासकट उडत होत्या. एकमेकांना रेटत ते मैदानात धडपडत होते. माद्या टवकारून ते भयानक युद्ध पाहत होत्या. मोठ्याची मान रक्तबंबाळ झाली होती. त्याच्या पायातलं बळ जात होतं, पण पराजय मान्य करायचा त्याची शक्ती उरली नव्हती. मागे हटताच उसंत घ्यायच्या आत, मोठ्याला छोटा धडकी मारत होता. मोठा गवा असाच मागं सरून मोहरा धरायच्या बेतात असतानाच छोट्यानं मान खाली केली आणि शिंगं रोखून त्यानं जोराचा हल्ला केला. मोठ्याला मान खाली करायचीदेखील फुरसत मिळाली नाही. छोट्यानं मोठ्याच्या मस्तकावर घासत शिंगं वर सरकवली. त्या धडकीनं मोठ्याचे पाय वाकले आणि तो उभ्या उभ्या पडला. त्याच्या कपाळावर मोठा पांढरा ओरखडा क्षणभर दिसला आणि दुसऱ्याच क्षणी तो रक्ताने माखला. कसाबसा धडपडत मोठा गवा उठून उभा राहिला आणि छोट्यानं विजयानं

दिलेला हंबार त्याच्या कानात घोंगावला. कुरणाच्या वर जाईपर्यंत तो थांबलाच नाही. निर्धास्त होऊन त्यानं मागं वळून पाहिलं, तो छोटा गवा तोऱ्यात त्या म्हैशीशी लगट करत होता. ते दृश्य त्याला असह्य झालं. त्यानं तिथेच बसकण मारली.

त्याच्या तोंडातून फेस पडत होता. नाकातून झळा निघत होत्या.

काही वेळ तो गव्यांचा कळप त्या ठिकाणी चरत राहिला. छोटा गवा दिमाखानं कळपावरून नजर फिरवत होता. माद्या चरत असताना आजूबाजूला नजर टाकत होता. बराच वेळ चरून झाल्यावर त्यानं जागा बदलायचं ठरवलं आणि मोठ्या गव्याच्या दिशेला नजर टाकून तो जंगलाकडे पळत सुटला. त्याच्या पाठोपाठ साऱ्या माद्या जाऊ लागल्या. मोठ्या गव्याला ते असह्य झालं. तो धडपडत उभा राहिला आणि त्यानं दीर्घ आवाज दिला.

त्या आवाजाबरोबर साऱ्या माद्या थबकल्या. त्या मान वळवून मोठ्या गव्याकडं पाहू लागल्या. छोट्या गव्यानेही मागं पाहिलं. माद्या थबकलेल्या पाहून त्याला संताप आला. एक वेळ त्यानं जोराचा मुसकारा केला आणि परत तो पळू लागला. माद्या त्याच्या मागोमाग धावू लागल्या. आपण म्हातारे झाल्याची, कळपातून फेकले गेल्याची जाणीव प्रथमच मोठ्या गव्याला तीव्रतेनं झाली. कळपातून बाहेर पडण्याची कल्पनाही त्याला असह्य झाली. आपल्या पराजयाचा, मानाचा, कसलाही विचार न करता तो कळपाच्या मागे धावू लागला. कळपातलं आणि त्याच्यातलं अंतर क्षणाक्षणाला कमी करीत सारं बळ एकवटून तो धावत सुटला.

कळपापासून थोड्या अंतरावर मोठा येताच छोट्याला त्याच्या खुरांच्या आवाजाची चाहूल लागली. त्यानं वळून पाहिलं, तो मोठा

गवा मागून येत होता. छोटा गवा थांबला. माद्या पुढे गेल्या.

छोटा गवा थांबलेला पाहताच, नकळत मोठ्या गव्याचे पाय थबकले. छोटा गवा फुरफुरत, आपल्या ओलसर नाकपुड्या फुलवून मोठ्या गव्याकडे आव्हानानं पाहत होता. आपले खूर उभारल्या जागी जमिनीवर ओढत होता. शेपटीचा गोंडा पाठीवर सडकत होता; पण मोठ्या गव्याला पुढं व्हायचं धैर्य नव्हतं. त्याच्या जखमांतून ओघळलेलं रक्त त्याच्या अंगावर गोठलं होतं. त्याचे टपोरे डोळे छोट्यावर स्थिर झाले होते. शेपटी लुळी होऊन लोंबत होती. काही क्षण ते एकमेकांकडे तसेच पाहत राहिले. छोट्या गव्याला कळप दूरवर गेल्याची जाणीव झाली आणि तो पाठ वळवून धावू लागला. मोठा गवाही काही अंतरावरून कळपामागून जाऊ लागला.

त्या दिवसापासून मोठा गवा असाच त्या कळपामागून जात होता. तो कळप जिथे थांबे, त्याच्यापासून थोड्या अंतरावर तोही थांबे. नंतरच्या पंधरा दिवसांत त्याची हाडं दिसू लागली. त्याची खाण्यावरची वासना तर पुरी तुटली. दिवसेंदिवस कळपाबरोबर धावणंही त्याला कठीण जात होतं. साध्या खड्यावरही त्याचं गेळं टिकेनासं झालं. गुडघ्यातून कळा सुटल्या. तोंडातून फेस आणि लाळ जमिनीला तात धरू लागली. प्रत्येक श्वासाबरोबर त्याच्या नाकपुड्या भाजून निघत होत्या. डोळ्यांतून पाणी ठिबकत होतं. शिंगातले किडे वळवळल्याची जाणीव त्याला स्पष्टपणे होत होती. झालेल्या जखमा पूर्वीसारख्या बऱ्या न होता दिवसेंदिवस चिघळत होत्या. अंगात ताकद नसताही तो कळपाची सोबत शोधीत होता. पाणी दिसेल तिथे तो मनसोक्त पाणी पीत होता. सवड सापडली,

तर अंग थंड करून घेत होता.

एके रात्री तो असाच थकून कळपापासून थोड्या अंतरावर पडला होता. भटकून त्याचा जीव त्रासला होता. पहाटेपर्यंत तरी दगदग मिटली, ह्या जाणिवेनं तो धापा टाकत होता. डोळे जड झाले होते, क्षणाक्षणाला ते मिटत होते. कसलीतरी चमत्कारिक ग्लानी त्याच्या डोळ्यांवर धरत होती.

उन्हाच्या तिरिपेने त्याला जागं केलं. चिकटलेले डोळे त्यानं कष्टानं उघडले. सर्वत्र रान पसरलं होतं. पक्ष्यांच्या चिवचिवाटानं जंगल भरून गेलं होते. एक बगळा त्याच्या अंगावर बसून त्याच्या जखमेतली कीड खात होता. त्यानं त्याला समाधान वाटत होते. गव्यानं डोळे मिटले. त्याच वेळी त्याला कळपाची आठवण झाली. त्यानं डोळे खाडकन उघडले. मान वर केली. एका झाडाच्या टोकावर एक गिधाड उन्हात पंख पसरून बसलं होतं. त्याचं लक्ष गव्याकडं लागलं होतं. रात्री जिथे कळप होता ती जागा मोठ्या गव्यानं धुंडली. शेणाचे पडलेले पो हुंगले. मान वर करून मोठ्याने आवाज दिला. जंगलात त्या आवाजाचा प्रतिध्वनी उमटला. झाडावर बसलेलं गिधाड पंख फडफडवत उडालं. त्याच्या आवाजाला उत्तर आलं नाही. गव्याने पुन्हा एकदा वास घेतला आणि तो धावत सुटला.

सारा दिवस तो धावत सुटला. त्यानं सारे उतार, चराईच्या जागा, पाण्याच्या जागा, बसायच्या जागा धुंडल्या; पण कळप त्याच्या नजरेत आला नाही. उन्हात त्याचं अंग पोळून निघत होतं. वृक्षाच्या सावलीत क्षण वा दोन क्षणांची विश्रांती घेत तो कळपाच्या आशेनं धावत होता. साऱ्या जंगलात आपण अगदी एकटे आहोत, असं त्याला वाटत होतं. प्रत्येक टापूवर उभा राहून जंगल न्याहाळत,

आवाज देत तो वेड्यासारखा फिरत होता. जंगल आपणाला खायला उठलं आहे, असं त्याला वाटत होतं.

संध्याकाळपर्यंत त्यानं अर्धं जंगल पालथं घातलं होतं, पण त्याला कळप भेटला नव्हतं. शेवटी फिरता फिरता तो त्या जंगलातल्या एका छोट्या तळ्यापाशी आला. त्या तळ्याला केंदळाने कडं केलं होतं. मधल्या भागात आरशासारखं स्वच्छ पाणी शांत होतं. कळपाची आणि आपली ताटातूट झाली, ह्या दु:खात तो आपलं सारं दु:ख विसरला होता. निराश मनानं तो तळ्याजवळ गेला. तळ्याच्या काठावर जाऊन तो पाणी पिऊ लागला. त्या गार पाण्याच्या स्पर्शानं त्याची गेळं थंडावली. तो तसाच तळ्यात शिरला. अंगाला होणारा गार स्पर्श त्याला बरा वाटत होता. पुढे झेप घेऊन त्यानं आपले सारं अंग पाण्यात लोटून दिलं आणि पाय हलवायला सुरुवात केली; पण क्षणांत पाय हलवण्याचेही त्राण अंगात नसल्याची जाणीव त्याला झाली. त्याच्या नाकातोंडात पाणी शिरलं. धडपडत तो कसाबसा काठावर आला आणि उभ्याउभ्या त्यानं काठाच्या उथळ पाण्यात बसकण मारली. ग्लानीनं त्याला घेरलं.

सकाळच्या गार वाऱ्यानं त्याला जाग आली. त्यानं आपले डोळे कष्टानं उघडले. तळ्यातल्या शांत पाण्यात दिसणाऱ्या दृश्याकडे तो पाहतच राहिला. त्या शांत तळ्यात त्याला त्याचा कळप दिसत होता. बराच वेळ तो स्थिर नजरेनं ते पाहत होता. हळूहळू त्यानं आपली दृष्टी वर वळवली. तळ्याच्या पलीकडे त्याचा कळप चरत होता. छोटा गवा दिमाखाने कळपावर लक्ष ठेवत होता. माद्या समाधानाने चरत होत्या. छोटा गवा चरता चरता एका वारुळाजवळ पोहोचला होता. छोट्या गव्यानं ते वारुळ एकदा निरखलं. आपली


शिंगं वळवली आणि खसकन ती आटणी वारुळात लावून त्याने मान घसकन वर केली; आणि वारुळाचं शिखर उन्मळून पडलं. वारुळावर त्यानं आपलं मस्तक जोरानं घुसळलं. त्याचं सारं मस्तक त्या तांबूस मातीनं माखलं. साऱ्या माद्या त्याच्याकडे शेपट्या खेळवत कौतुकानं पाहत होत्या. त्या कौतुकाची जाणीव होऊन त्यानं पुन्हा वारुळावर हल्ला चढवला.

मोठ्या गव्याला ते पाहणं असह्य झालं. प्रयत्न करूनही त्याला उठवत नव्हतं. सारं बळ एकवटून तो उभा राहिला आणि त्यानं आवाज दिला. तळ्याकाठचे सारे पक्षी फडफडत उठले. टिटव्या ओरडू लागल्या. माद्या कान टवकारून त्याच्याकडं पाहू लागल्या. छोट्या गव्यानं मान वळवली. मोठा गवा त्याच्याकडं टक लावून पाहत तळ्याच्या पलीकडे उभा होता.

त्या मोठ्या गव्याला पाहताच क्रोधानं खूर बडवत, नाकपुड्या फेंदारत छोटा गवा चार पावलं पुढे झाला. उभारल्या जागेवरून मोठ्या गव्यानं पुन्हा एकदा दीर्घ हंबार केला, पण त्या हंबारात युद्धाचं आव्हान नव्हतं. अभिमानाचा सूर नव्हता. कसल्यातरी अज्ञात व्यथेची व्याकूळता होती. हंबार करून कसंबसं एक पाऊल मोठ्या गव्यानं पुढे टाकलं. दुसरं पाऊल टाकण्याचं त्राण त्याच्या अंगात नव्हतं. उभ्याउभ्याच तो धाडकन पाण्यात कोसळला. त्याचं सारं मस्तक पाण्याखाली गेलं आणि शिंगांची दोन टोकं तेवढी त्या पाण्यावर दिसू लागली.

◆

## पुस्तकाच्या पानांतून




# परोपकारी बिरबल

आणि

इतर कथा

**मंजुषा आमडेकर**

## हिरा गेला विरघळून

दिल्लीत एक म्हातारा कारागीर राहत होता. त्याच्या हातात एक विलक्षण कसब होतं. तो हिऱ्यांना अप्रतिम पैलू पाडू शकायचा. त्याला मूलबाळ नव्हतं. त्याची म्हातारी बायको आणि तो असे दोघेच राहत असत. म्हातारपणामुळे त्याला कुणी नोकरीवर ठेवून घेईना. त्यातून त्या काळी

२५



पेन्शन वगैरेची सोय नसल्यामुळे आता उत्पन्नही बंद झालं होतं. जगायचं कसं हा त्याच्यापुढे मोठाच प्रश्न निर्माण झाला होता.

एके दिवशी हे दोघं नवरा-बायको याच विषयावरून आपापसात गप्पा मारत असताना अचानक बायको म्हणाली, ''आपल्या या परिस्थितीवर काय हो तोडगा निघणार? तुमच्या मित्रमंडळींना विचारून पाहा ना, काही उपाय सापडतो का ते!'' त्यावर नवरा म्हणाला, ''अगं, मी पाहिलं विचारून; पण आपल्याला मदत अशी कुणीच काही करू शकत नाही; पण एका मित्रानं मला बिरबल महाराजांकडे जायचा सल्ला दिलाय. त्यांनी इतक्या जणांना मदत केली आहे, आपल्यालाही करतील की. मी उद्याच जाऊन विचारून पाहतो त्यांना. तुझं काय म्हणणं आहे?''

ती आनंदानं म्हणाली, ''अगदी अवश्य जा. ते नक्की काहीतरी मदत करतील.''

दुसऱ्या दिवशी सकाळी उठून नवरा तयार झाला आणि

बिरबलाकडे गेला. बिरबलाला नमस्कार करून त्यानं आपली सगळी परिस्थिती त्याला कथन केली. मग तो म्हणाला, ‘‘महाराज, हातात कसब जरी असलं तरी आता वयोमानानुसार मी थकलो आहे. माझ्याच्यानं पहिल्यासारखं काम करवत नाही; पण जगावं कसं तेही कळत नाही. आता तुम्हीच काहीतरी युक्ती केलीत तर बरं होईल.’’ बिरबलानं काही क्षण विचार केला आणि एकदम चुटकी वाजवून तो म्हणाला, ‘‘एक छानशी युक्ती सुचलीय मला; पण मी सांगतो तसं करावं लागेल.’’

तो म्हातारा कारागीर म्हणाला, ‘‘नक्की करीन महाराज. सांगून तर पाहा.’’

बिरबल म्हणाला, ‘‘असं कर, खडीसाखरेचा एक मोठा तुकडा घे आणि त्याला हिऱ्यासारखे पैलू पाड. हुबेहूब हिराच वाटला पाहिजे तो. जमेल का?’’

तो माणूस म्हणाला, ‘‘हात्तिच्या, एवढंच ना? न जमायला काय झालं! उद्याच बनवून आणतो खडीसाखरेचा हिरा.’’

असं म्हणून तो नमस्कार करून घरी गेला. रात्रभर जागून त्यानं मोठ्या कष्टानं खडीसाखरेचा हिरा तयार केला आणि दुसऱ्याच दिवशी बिरबलाला तो दाखवायला आणला. तो हिरा पाहून बिरबल थक्कच झाला. म्हणाला, ‘‘काय उत्तम कला आहे रे तुझ्या अंगात. शंकासुद्धा येत नाहीये की हा खरा हिरा नसून खडीसाखरेचा हिरा आहे म्हणून. असो. आता असं करू या, आपण दोघं प्रत्यक्ष बादशहाकडे जाऊया.’’

तिथे जाऊन काय म्हणायचं, काय करायचं ते सगळं बिरबलानं कारागिराला व्यवस्थित समजावून सांगितलं. दोघंही राजवाड्यात

आले. सकाळची वेळ असल्यामुळे बादशहा अंघोळीला निघण्याच्या तयारीत होता. त्यापूर्वी तो दाढी करून घेत होता.

बादशहाला कुर्निसात करून बिरबल म्हणाला, ‘‘सरकार, आज सकाळी सकाळी मला हा कारागीर भेटला. त्याच्याकडे एक खास हिरा आहे. तो घेऊन तो जगप्रवासाला निघाला आहे. बाहेरच्या देशात जाऊन हा हिरा विकायचा त्याचा विचार आहे; पण मला आपलं असं वाटलं, की इतका मौल्यवान हिरा यानं जर बाहेर जाऊन विकला तर आपली नाचक्की होईल. इतर राजांना असं वाटेल की इतका महागडा हिरा घेण्याची आपली ऐपत नाही. अशा प्रकारे तुमची अप्रतिष्ठा व्हावी हे काही मला बरं वाटत नाही. म्हणून मी याला घेऊन इकडेच आलो थेट. हा हिरा तुम्ही स्वत:च विकत घेतला तर बरं होईल असं मला वाटतं.’’ बादशहाचा चेहरा उजळला. तो म्हणाला, ‘‘बिरबल, तू किती दूरचा विचार करतोस रे! पाहू तर दे मला तो हिरा.’’



बिरबलानं कारागिराला खूण केल्यावर त्यानं खिशातून तो हिरा बाहेर काढला आणि बादशहाच्या हातावर ठेवला. इतका टपोरा नि चमचमता हिरा पाहून बादशहा खूपच खूश झाला. तो म्हणाला, ''हिरा उत्तम आहे यात काही शंकाच नाही. मी घेतला हा विकत. मी हा ठेवून घेतो. आता मी जरा तयार होणार आहे दरबारात जाण्यासाठी. तू दरबारात येऊन पैसे घेऊन जा.''

कारागिरानं 'जी, सरकार,' असं म्हणून त्याला कुर्निसात केला आणि तो बिरबलासह निघून गेला.

अंघोळीला जाण्याच्या गडबडीत बादशहानं तो हिरा आपल्या अंगरख्याच्या खिशात ठेवून दिला आणि तो हमामखान्यात निघून गेला. तिकडे जाईपर्यंत तो हिऱ्याचा विषय पूर्णपणे विसरून गेला. अंघोळ वगैरे करून तो बाहेर आल्यावर त्याला एकदम हिऱ्याची आठवण झाली. त्यानं अंगातून काढलेल्या अंगरख्याच्या खिशात हात घातला; पण खडीसाखरेचा तो हिरा कधीच पाण्यात विरघळून गेला होता; पण बादशहाला कुठे ते माहीत होतं? त्यानं तो खूप शोधला; पण तो मिळणारच नव्हता, त्यामुळे बादशहा वैतागून महालातून बाहेर पडला.

दरबारात पोहोचल्यावर थोड्याच वेळात त्याच्यासमोर तो कारागीर हजर झाला. त्यानं अत्यंत विनम्रपणानं बादशहाकडे हिऱ्याचे पैसे मागितले. बादशहा म्हणाला, ''किती किंमत आहे त्याची?''

तो म्हणाला, ''सरकार, फक्त पंधरा हजार रुपये.''

चकित झालेला बादशहा म्हणाला, ''अरे, काय सांगतोस काय? ही किंमत फार वाटतेय मला.''

आता असं काहीतरी होणं अपेक्षितच होतं बिरबलाला. म्हणून

तर त्यानं त्या कारागिराला काय बोलायचं ते आधीच शिकवून ठेवलेलं होतं. त्याप्रमाणे तो कारागीर म्हणाला, ''सरकार, याच कारणानं मी तो परदेशी जाऊन विकणार होतो. मला वाटलंच होतं, की हिंदुस्थानात याची खरी किंमत होणार नाही. अहो, तो इतका दुर्मिळ हिरा आहे, की मला बाहेरच्या देशात याहूनही अधिक पैसे मिळतील. कृपा करून आपण मला माझा हिरा परत द्यावा. मी तो दुसरीकडे विकेन.''

आता मात्र चांगलीच पंचाईत झाली बादशहाची. तो हिरा हरवला असं सांगणं त्याला योग्य वाटलं नाही पण दुसरा काही पर्यायही नव्हता समोर. त्यामुळे त्यानं; नाईलाजानं खजिनदाराला आज्ञा केली, ''या कारागिराला पंधरा हजार सुवर्णमुद्रा देऊन टाका.''

खजिनदारानं त्याप्रमाणे पैसे आणले आणि कारागिराला दिले. तो आनंदानं बादशहाची स्तुती करत निघून गेला. घरी गेल्यावर त्यानं बायकोला ते पैसे दाखवल्यावर तिच्या डोळ्यांत पाणीच आलं. इतके पैसे एकदम त्या दोघांनी आयुष्यात कधी पाहिले नव्हते. आता म्हातारपणाची काही चिंताच उरली नव्हती.


दुसऱ्या दिवशी दोघंही सकाळी सकाळी बिरबलाच्या घरी गेले आणि त्यांनी बिरबलाचे मनापासून आभार मानले. तो म्हणाला, ''महाराज, खूप मोठे उपकार झाले तुमचे आमच्यावर. मला करता येण्यासारखं काही काम असेल तुमचं तर जरूर सांगा. अगदी आनंदानं करून देईन मी.''

बिरबल फक्त हसला आणि त्यानं कारागिराची पाठ थोपटली. म्हणाला,

''अवश्य सांगेन. तुम्ही आता आनंदानं, काळजी न करता राहा.''

◆

## पुस्तकाच्या पानांतून




# सफर प्राणिसंग्रहालयाची

**मोहम्मद उमर**

अनुवाद

**निर्मिती कोलते**

बेन, ॲडम आणि जस्मिन या तिघांची घट्ट मैत्री आहे. तिघांच्याही वेगवेगळ्या विशेष गरजा आहेत. बेनला ऐकू येत नाही त्यामुळे तो मूकबधिरांची सांकेतिक भाषा वापरतो. त्याला प्राणी आवडतात आणि पोहायलासुद्धा आवडतं. काही लोक त्याच्या सांकेतिक भाषेची टर उडवतात, ते त्याला मुळीच

आवडत नाही. तो खाणाखुणा करून काय बोलतो आहे, हे लोकांना कळलं नाही तरी त्याला राग येतो.

ॲडमला चालता येत नाही, त्यामुळे तो व्हीलचेअर वापरतो. त्याला गाणी ऐकायला आणि फुटबॉलचे सामने पाहायला आवडतं. त्याला कुत्र्यांची भीती वाटते आणि कुत्रा अंगाजवळ आलेला त्याला अजिबात आवडत नाही. व्हीलचेअर वापरत असल्यामुळे सार्वजनिक ठिकाणी बऱ्याच गोष्टी करता येत नाहीत, हे पण त्याला आवडत नाही.

जस्मिनला सतत कसलंतरी टेन्शन किंवा भीती वाटत असते. ती नेहमीच तणावाखाली असते. तिला चित्रं काढायला आवडतात आणि तिला अभिनेत्री व्हायचं आहे. तिला अनोळखी लोकांशी बोलण्याची, गोंगाटाची आणि कुत्र्यांची भीती वाटते.

बेनच्या वाढदिवसाच्या दिवशी, त्याच्या काकांनी एक ग्रीटिंग कार्ड आणि प्राणिसंग्रहालयाची तीन तिकिटं पाठवली. दुसऱ्या दिवशी, त्याने ॲडम आणि जस्मिनला एखाद्या सुट्टीच्या दिवशी त्याच्याबरोबर प्राणिसंग्रहालयात जाण्याचं आमंत्रण दिलं. तिघांनाही प्राणिसंग्रहालय बघण्याची उत्सुकता होती. त्या संध्याकाळी बेनने त्याच्या आई-वडिलांना प्राणिसंग्रहालयात सोडण्याबद्दल विचारले.

परंतु, त्याने जो दिवस ठरवला होता त्या दिवशी त्यांना वेळ नव्हता. दुसऱ्या दिवशी त्याने जस्मिन आणि ॲडमला त्यांच्या आई-बाबांना विचारायला सांगितलं; पण ते दोघंही म्हणाले, की त्यांच्या आई-बाबांना ऑफिस असल्यामुळे सोडायला यायला जमणार नाही. बेनला या सफरीची फारच उत्सुकता होती आणि त्याला ती पुढे ढकलायची नव्हती. तो म्हणाला, की आपण ट्रेन, बस अशा

सार्वजनिक वाहनांनी जाऊ या. मला नाही वाटत आपल्याला तिघांनाच हे जमेल. प्राणिसंग्रहालयापर्यंत कसं जायचं हे पण मला माहीत नाही. ॲडम उसासा टाकत म्हणाला, की कुण्या मोठ्या व्यक्तीच्या मदतीशिवाय एकदाही त्याने इतक्या दूर प्रवास केला नव्हता.

''तिकडे जायचा रस्ता मला पण माहीत नाही. मला भीती वाटते की आपण कायमचे हरवून जाऊ,'' जस्मिनने त्यांचीच री ओढली.

मात्र बेनचा हिरमुसलेला चेहरा पाहून दोघांनीही घाबरतच सार्वजनिक वाहनातून प्रवास करायला होकार दिला.

ठरलेल्या दिवशी तिघं एकत्र जमले आणि रेल्वे स्टेशनच्या दिशेने चालू लागले. जस्मिनने ॲडमला व्हीलचेअर ढकलायला मदत केली. ''तुला खरंच असं वाटतं की आपल्याला तिकीट वगैरे काढता येईल आणि योग्य त्या ट्रेनमध्ये बसता येईल?'' तिने आपली शंका बोलून दाखवली.

''व्हीलचेअरसकट ट्रेनमध्ये चढता येईल का मला?'' ॲडम घाबरत म्हणाला.

''मलाही लाउडस्पीकरमधून दिल्या जाणाऱ्या सूचना कळणार नाहीत, ही भीती आहेच. शिवाय लोकांना माझी भाषा समजणार नाही; हा पण मुद्दा आहे.'' बेनलासुद्धा टेन्शन आलं होतं.

बोलताबोलता तिघं स्टेशनवर येऊन पोहोचले. तिथे काम करणाऱ्या एका माणसाने त्यांना कुठे जायचं आहे, असं विचारलं. ॲडमने शांतपणे त्या माणसाला त्यांना प्राणिसंग्रहालय बघायला जायचं आहे, हे सांगितलं. हे ऐकून त्या माणसाने तिघांनाही

तिकिटं काढायला मदत केली आणि योग्य त्या प्लॅटफॉर्मवर कसं जायचं हेसुद्धा समजावून सांगितलं.

''मी व्हीलचेअरवर बसून ट्रेनमध्ये चढू शकेन का?'' ॲडमने विचारलं.

''का नाही? नक्की चढता येईल.'' असं म्हणत त्या माणसाने व्हीलचेअरसाठी रॅम्प काढून ठेवला.

''तुमची ट्रिप मस्त होऊ दे.'' त्याने शुभेच्छा दिल्या.

तिघांनीही त्याचे आभार मानले. योग्य ट्रेनमध्ये बसल्यामुळे तिघंही आनंदात होते. स्टेशनवर गर्दी असली तरी ट्रेनमध्ये शांतता होती. त्यामुळे जस्मिन पण खूश होती. खिडकीबाहेर बघताबघता ती म्हणाली, ''किती माणसं आहेत सगळीकडे!'' ॲडमचं लक्ष अचानक जस्मिनच्या पायांकडे गेलं.

''तू दोन वेगवेगळ्या रंगांचे मोजे का घातले आहेस?'' तो म्हणाला.

''अरे, सकाळी मी इतकी टेन्शनमध्ये आणि गोंधळलेली होते की माझ्या लक्षातच आलं नाही की मी वेगळे वेगळे मोजे घातले आहेत.''

तिचं उत्तर ऐकून ॲडम आणि बेन दोघांनाही हसू फुटलं. थोडीशी शांत झालेली जस्मिन ट्रेन सुरू झाल्यावर मात्र पुन्हा घाबरायला लागली. कुठे उतरायचं आहे आपल्याला कसं कळणार? बेनला हाताने खुणा करताना तिचे हात थरथरत होते. बेनलासुद्धा टेन्शन आलं होतं; तरी 'होईल सगळं नीट' असं त्याने तिला खुणेने सांगितलं.

◆

## पुस्तकाच्या पानांतून




छोट्यां साठी


# हवा, पाणी, प्रकाशाचे प्रयोग

**डी. एस. इटोकर**

## पाण्याचे प्रयोग

### १. पाणी समपातळीत राहते

पाणी द्रव पदार्थ आहे. ज्या आकाराच्या भांड्यात त्याला ओतावे, तो आकार त्याला प्राप्त होतो, हे आपणास माहीत आहे. पाणी नेहमी समपातळीत राहते, हे दाखविण्यासाठी आपण प्रयोग करू.




आपल्या डॉक्टरकाकांकडून तीन वेगवेगळ्या जाडीच्या सिरींजेस मागून आणा. त्यांच्या आत असणारे पिस्टन्स काढून ते धुऊन घ्या. फक्त बाहेरच्या नळीची आपणास गरज आहे.

कडक प्लॅस्टिकची सहा इंच लांबीची नळी घ्या. या नळीची दोन्ही बाजूंची मोकळी छिद्रे मेण लावून पक्की बंद करा.


नळीच्या लांबीवर समान अंतरावर तीन खुणा करून घ्या. या ठिकाणी खिळा गरम करून तीन छिद्रे पाडा. त्या छिद्रात सिरींजचे टोक दाबून घट्ट बसवा. अशा प्रकारे तीन छिद्रांत तीन सिरींजेस बसवा. आकृतीत दाखविल्याप्रमाणे उपकरण तयार होईल.

मोठ्या सिरींजमध्ये हळूहळू पाणी ओता. पाणी सिरींजमधून आडव्या नळीत येईल व हळूहळू इतर दोन सिरींजेसमध्ये येईल. पाणी टाकणे बंद केल्यावर आपणास असे दिसेल की, तीनही सिरींजेसमधील पाण्याची पातळी एकच आहे. पुन्हा पाणी टाकले तरी वाढलेली पातळी एकच आहे. मोठ्या सिरींजमध्ये पातळी खाली व लहान सिरींजमध्ये पाण्याची पातळी वर आहे असे दिसणार नाही.

म्हणून पाणी नेहमी समपातळीत राहते, हे आपणास या प्रयोगातून दाखविता येते.

## २. पाण्याच्या उंचीवर त्याचा दाब अवलंबून असतो

एखाद्या उंच भांड्यात पाणी ठेवले, तर त्यातील पाण्याचा दाब हा वरच्या पातळीवर कमी असतो व खालच्या पातळीवर जास्त असतो हे दाखविणारा हा प्रयोग करून पाहू.




एक प्लॅस्टिकची उभी शिशी घ्या. तिचा वरील भाग कापून काढा. शिशीच्या उभ्या बाजूवर तळापासून थोडे वर बारीक छिद्र पाडा. छिद्र पाडण्यासाठी बारीक खिळा गरम करून त्याचे टोक शिशीवर दाबा, म्हणजे छिद्र पडेल. याच खिळ्याने वेगवेगळ्या उंचीवर आणखी दोन छिद्रे पाडा. अशा प्रकारे शिशीला आपण वेगवेगळ्या उंचीवर तीन छिद्रे पाडली. ही शिशी जमिनीवर उभी ठेवा.


शिशीत भरपूर पाणी भरा व नंतर काय होते ते पाहा. शिशीच्या वरच्या छिद्रातून पडणारी पाण्याची धार शिशीपासून थोड्या अंतरावर पडते. त्याखालील छिद्रातून पडणारी धार जास्त अंतरावर पडते व सर्वांत खालील छिद्रातून पडणारी सर्वांत जास्त अंतरावर पडते.

असे होण्याचे कारण म्हणजे खालील छिद्राच्या ठिकाणी वरच्या पाण्याचा दाब सर्वांत जास्त आहे; कारण त्या ठिकाणी पाण्याची उंची सर्वांत जास्त आहे. वरच्या छिद्रातून पडणारी धार जवळ पडते; कारण या छिद्रापासून वरच्या पाण्याची उंची कमी आहे.

यावरून असे सिद्ध होते की, पाण्याचा दाब हा त्याच्या उंचीवर अवलंबून असतो.

## ३. उष्णतेने पाणी प्रसरण पावते

एखाद्या वायू, द्रव व घन पदार्थाला उष्णता दिली, तर त्याचे आकारमान वाढते. यालाच आपण तो पदार्थ प्रसरण पावला असे म्हणतो. उष्णता दिल्याने पाणी प्रसरण पावते, हे या प्रयोगातून दाखविता येते. या प्रयोगासाठी घट्ट रबरी बूच असलेली रिकामी काचेची शिशी घ्यावी. त्याचप्रमाणे बॉलपेनची रिकामी व स्वच्छ रिफील घ्यावी. शिशीचे बूच काढून त्याला रिफील जाईल एवढे छिद्र पाडावे. त्या छिद्रातून रिफील दाबून बसवावी. रिफीलच्या मध्यभागी बूच येईल अशी सरकवून  घ्यावी.



पाणी प्रसरण पावते

काचेच्या शिशीत रंगीत पाणी घ्यावे. शिशी रंगीत पाण्याने पूर्ण भरून घ्यावी. या शिशीला रबरी बूच घट्ट दाबून बसवावे. त्यामुळे नळी रंगीत पाण्यात बुडेल व काही रंगीत पाणी रिफीलमध्ये घुसेल. ते बुचाच्या वरच्या भागात असलेल्या रिफीलमध्ये दिसेल. त्या ठिकाणी नळीवर खुणा कराव्यात. ही काचेची शिशी गरम पाण्यात बुडवावी. थोड्याच वेळात रिफीलमधील पाण्याची पातळी वरवर सरकू लागते. याचा अर्थ असा झाला की, उष्णतेने शिशी गरम झाली, त्यामुळे पाणी गरम झाले व प्रसरण पावले व नळीत वर चढले. उष्णतेने पाणी प्रसरण पावते, हे आपण सिद्ध केले.

उन्हाळ्याच्या दिवसांत ही शिशी थोडा वेळ उन्हात ठेवली, तरी पाण्याचे प्रसरण आपणास पाहता येईल.

◆

**१६ मे ते १५ जून २०२५ दरम्यानचा दिनविशेष**

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर **५० टक्क्यांपर्यंत सूट**

**खालील संचांवर १६ ते ३१ मे दरम्यान खास सवलत**

**१७ मे - अंजनी नरवणे यांचा जन्मदिन**

'आपण आपले ताणतणाव-एक चिंतन','हितगूज–तणावयुगातील तरुण पिढीशी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २६०/- । सवलत किंमत १५९/-**

---

**१८ मे - मृणालिनी सावंत यांचा जन्मदिन**

'उत्तुंग' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ७९०/- । सवलत किंमत ५५३/-**

---

**२४ मे - राजदीप सरदेसाई यांचा जन्मदिन**

'डेमोक्रसीज इलेव्हन' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ५९५/- । सवलत किंमत ३४९/-**

---

**२५ मे - गणेश मानुगडे यांचा जन्मदिन**

'बाजिंद', 'धना' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ४२०/- । सवलत किंमत २९८/-**

---

**२८ मे - इयान फ्लेमिंग यांचा जन्मदिन**

'फ्रॉम रशिया विथ् लव्ह', 'गोल्डफिंगर', 'ऑक्टोपसी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ५५०/- । सवलत किंमत २९९/-**

---

**२९ मे - जागतिक शांतताप्रिय दिवस**

संच १ - 'मी मलाला', 'महात्मा गांधी आणि तीन माकडे', 'ममतेची मूर्ती मदर तेरेसा', 'मदर टेरेसा' या पुस्तकांवर विशेष सवलत

**मूळ किंमत १०४०/- । सवलत किंमत ६७६/-**

संच २ - 'मोहनदास', 'दयादीपिका फ्लॉरेन्स नाइटिंगेल', 'दुसरे प्रॉमिथिअस : महात्मा गांधी,' 'महात्मा गांधी आणि तीन माकडे', 'बापूजींची अमर कहाणी', 'महात्मा गांधी आणि त्यांचा भारतीय संघर्ष' या पुस्तकांवर विशेष

सवलत

**मूळ किंमत २०६५/- । सवलत किंमत १५४९/-**

संच ३ - 'तथागत गोतम बुद्ध'

**मूळ किंमत १५९५/- । सवलत किंमत ११९६/-**

**३१ मे - अहिल्याबाई होळकर यांचा जन्मदिन**

'कर्मयोगिनी', 'सतिसाध्वी देवी अहिल्या' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ७४०/- । सवलत किंमत ४६५/-**

KARMAYOGINI (English) या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत १७९/-**

**३१ मे - मिलिंद जोशी यांचा जन्मदिन**

'एका परिसाची कथा' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १२९/-**

**खालील संचांवर १जून ते १५ जून दरम्यान खास सवलत**

**१ जून - ल. सि. जाधव यांचा जन्मदिन**

'अडगळ', 'धर्मवेध' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ६७०/- । सवलत किंमत ४६२/-**

**१ जून - राजन गवस यांचा जन्मदिन**

'आपण माणसात जमा नाही', 'भंडारभोग', 'चौंडकं', 'रिवणावायली मुंगी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ९०५/- । सवलत किंमत ६६२/-**

**१ जून - बा. ग. केसकर यांचा जन्मदिन**

'डव्हाळं', 'सुर्वंता'या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३६०/- । सवलत किंमत २४९/-**

**१ जून - दादासाहेब मोरे यांचा जन्मदिन**

'गबाळ', 'अंधाराचे वारसदार', 'विमुक्त' या पुस्तकांवर विशेष सवलत

**मूळ किंमत ५३०/- । सवलत किंमत ३१८/-**

**१ जून - लक्ष्मण माने यांचा जन्मदिन**
'उपरा', 'किटाळ', 'पालावरचं जग', 'खेळ साडेतीन टक्क्यांचा', 'बंद दरवाजा', 'भटक्याचं भारूड', 'उद्ध्वस्त', 'यशवंतराव चव्हाण : आठवणी-आख्यायिका', 'विमुक्तायन', 'का कराचं शिकून?', 'क्रांतिपथ', 'रेषेपलीकडील लक्ष्मण', 'प्रकाशपुत्र', 'अनिल' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ४०७०/- । सवलत किंमत ३०५३/-**

---

**१ जून - वसंत गायकवाड यांचा जन्मदिन**
'तथागत गोतम बुद्ध' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १५९५/- । सवलत किंमत १११७/-**

---

**४ जून - आनंद कान्हेरे यांचा जन्मदिन**
'मॅस्वी कान्हेरे' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १८०/- । सवलत किंमत ९९/-**

---

**४ जून-जागतिक निष्पाप मुलांचा क्रूर बळी दिवस**
**संच १**-'हरवलेले बालपण', 'झोंबी', 'खाली जमीन वर आकाश', 'वेस्टेड', 'हिरॉईन ऑफ द डेझर्ट', 'बिलाँगिंग' 'नेव्हर टू रिटर्न', 'ॲन आय फॉर ॲन आय', 'द काइट रनर', 'ए थाउजंड स्प्लेन्डिड सन्स' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ३४५५/- । सवलत किंमत २१४१/-**
**संच २** - 'डिनायल', 'द डायरी ऑफ मेरी बर्ग', 'वेदनेची फुले', 'मी मलाला', 'लव्हिंग नॅटली' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १५०५/- । सवलत किंमत ९१५/-**

---

**५ जून - जागतिक पर्यावरण दिवस**
**संच १** - 'वसुंधरा', 'पर्यावरण प्रदूषण', 'वेध पर्यावरणाचा', 'आपली सृष्टी १० पुस्तकांची मालिका', 'वायू प्रदूषण', 'विपुलाच सृष्टी', 'कथारूपी खगोलशास्त्र' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत २६००/- । सवलत किंमत १६६३/-**
**संच २** - 'केल्याने होत आहे रे!', 'अंतरिक्षाच्या अंतरंगात', 'देव? छे! परग्रहावरील अंतराळवीर!', 'पृथ्वीवर माणूस उपराच!', 'अंतरिक्षाचा वेध',

‘अवनी एक नवी’, ‘कॉर्पोरेटला रामराम, शेतीला सलाम!’, ‘हरित युद्धे’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १७१५/- । सवलत किंमत १२०१/-**

**५ जून - केन फोलेट यांचा जन्मदिन**
‘ऑन द विंग्ज ऑफ ईगल्स’, ‘आय ऑफ द निडल’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ११५०/- । सवलत किंमत ७६३/-**

**६ जून - एम. जे. हायलंड यांचा जन्मदिन**
‘कॅरी मी डाऊन’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १२९/-**

**८ जून - रामचंद्र खाटमोडे यांचा जन्मदिन**
‘सर्जा’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ९९/-**

**९ जून - किरण बेदी यांचा जन्मदिन**
किरण बेदी यांच्या अकरा पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत २९४५/- । सवलत किंमत २२०९/-**

**१० जून - बाबाराव मुसळे यांचा जन्मदिन**
‘वारूळ’, ‘नो नॉट नेव्हर’, ‘हाल्या हाल्या दुधू दे!’, ‘झुंड’, ‘झिंगू लुखू लुखू’, ‘मोहरलेला चंद्र’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत २४७५/- । सवलत किंमत १९५५/-**

**११ जून - जॉर्जिना हार्डिंग यांचा जन्मदिन**
‘हेरगिरीचा पोरखेळ’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २४०/- । सवलत किंमत १४९/-**

**१२ जून - ॲन फ्रँक यांचा जन्मदिन**
‘डायरी ऑफ ॲन फ्रँक’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १४९/-**

**१२ जून - जागतिक बालकामगार विरोधी दिन**

**संच १** - 'हरवलेलं बालपण', 'खाली जमीन वर आकाश', 'सर्चिंग फॉर डॅडी', 'शेम', 'हिरॉइन ऑफ द डेझर्ट', 'वेदनेची फुले', 'शॅपेल' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १८८०/- । सवलत किंमत १२६०/-**

**संच २** - 'झोंबी', 'वेस्टेड', 'बिलाँगिंग', 'नेव्हर टू रिटर्न', 'ॲन आय फॉर ॲन आय', 'द काइट रनर', 'ए थाउजंड स्प्लेन्डिड सन्स' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २५१५/- । सवलत किंमत १६८५/-**

---

**१२ जून - भा. द. खेर यांचा जन्मदिन**

भा. द. खेर यांच्या २५ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ७७९०/- । सवलत किंमत ५६००/-**

---

**१४ जून - जी. डी. मोरे यांचा जन्मदिन**

**A Methodical English Grammar** या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४९५/- । सवलत किंमत ३४९/-**

---

**१५ जून-अण्णा हजारे यांचा जन्मदिन**

'अण्णा हजारे', 'लढा लोकपालचा' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३४०/- । सवलत किंमत १८७/-**

◆

**❖ किमतींमध्ये बदलाची शक्यता ❖**

**अधिक माहितीसाठी संपर्क :** फोन : ०२०-२४४७६९२४ / २४४७५४६२ / **Whats App No. ९४२०५९४६६५**

**website : www.mehtapublishinghouse.com**

**आपल्या लाडक्या लेखकांना शुभेच्छा !**

**या ईमेलवर पाठवा. author@mehtapublishinghouse.com**



# आवर्जून वाचावं

पेरुमाल मुरुगन





**शोथा रूस्थावेली**

अनुवाद : निर्मिती कोलते




अनु.: डॉ. मानसी केळकर




अनु.: सुप्रिया वकील




**मंजुश्री गोखले**




**अश्विन सांघी**

अनु.: लीना सोहोनी



**अब्दुल्ला खान**

अनु.: उल्का राऊत




**मंजूषा आमडेकर**









**RNI. No. MAHMAR/2000/02739**
Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.
Publication Date : 11/05/2025 Posting Date : 11/05/2025




**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन - (०२०) २४४७६९२४

प्रति, ____________________